


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १८१ * नांदेड * गुरूवार, दि. ९ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# इराणवर पुन्हा हल्ला होऊ शकतो, डोनाल्ड ट्रम्प यांची धमकी

## जगाभरात पुन्हा खळबळ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका आणि इराणमधील युद्ध तीन महिन्यांच्या कालावधीनंतर थांबलं होतं. दोन्ही देशांत युद्धविरामाची घोषणा देखील झाली होती. त्यामुळे दोन्ही देशातील तणाव हळूहळू कमी होत असतानाच अचानक अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबरोबरचा युद्धबंदीचा हंगामी करार संपुष्टात आल्याची घोषणा केली आहे.

तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा एकदा थेट युद्धाची धमकी दिल्यामुळे जगात खळबळ उडाली आहे. 'रात्रीतून इराणवर पुन्हा हल्ला होऊ शकतो' अशी नवी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिली आहे. ट्रम्प यांच्या या धमकीमुळे



मध्य पूर्वेत पुन्हा एकदा युद्धाचे ढग गडद झाले आहेत.

अमेरिका आणि इराणमधील युद्धबंदी करार संपल्याची घोषणा केल्यानंतर काही तासांतच डोनाल्ड ट्रम्प यांनी रात्री अमेरिका इराणवर हल्ला करणार असल्याचे संकेत दिले आहेत. ट्रम्प यांनी म्हटलं की, हॉर्मुज सामुद्रधुनीमध्ये इराणने जहाजांवर केलेले हल्ले, म्हणजे युद्धविरामाच्या कराराचं उल्लंघन आहे. इराण सध्या जे काही करत आहे, त्याबद्दल मी समाधानी नाही. हा विषय सत्तापालटाचा नाही. मात्र, इराणला अणुशस्त्र मिळावे, अशी आमची अजिबात इच्छा नाही. त्यामुळे इराण करत असलेले हे हल्ले युद्धविरामाच्या कराराचं उल्लंघनच आहे. इराणने असं करणं चुकीचं आहे. इराणबरोबरच्या आमच्या करारानुसार, त्यांनी त्यांचा अणुकार्यक्रम थांबवणं आवश्यक आहे, अन्यथा आम्ही स्वतः तो थांबवू, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर पुन्हा एकदा हल्ला करण्याची धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी म्हटलं की, हे युद्ध नाही, तर इराणला अणुशस्त्रांपासून मुक्त करण्याची ही एक मोहीम आहे. कदाचित आज रात्रीच इराणवर पुन्हा एकदा हल्ला होऊ शकतो. मी त्यांना हा केवळ एक इशारा देत आहे, अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे.

## शेवटच्या १४ मिनिटांत ३ गोल करत मेस्सीच्या अर्जेंटिनाने इजिप्तच्या जबड्यातून विजय हिसकावला

**मुंबई (प्रतिनिधी)–** फुटबॉल विश्वचषक २०२६ च्या राउंड ऑफ १६ मध्ये फुटबॉल इतिहासातील एक सर्वात अविस्मरणीय आणि थरारक सामना पाहायला मिळाला. नेमार आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांसारखे दिग्गज आधीच स्पर्धेतून बाहेर पडले असताना, लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिनाने मात्र इजिप्तच्या जबड्यातून विजय हिरावून आणला. तब्बल २-० ने पिछाडीवर असलेल्या अर्जेंटिनाने सामन्याच्या शेवटच्या १४ मिनिटांत सलग ३ गोल मारत इजिप्तचा ३-२ असा पराभव केला आणि क्वार्टर फायनलमध्ये दिमाखात प्रवेश केला.

सामन्याची सुरुवात इजिप्तने अत्यंत आक्रमक केली. १५ व्या मिनिटाला यासिर इब्राहिमने शानदार गोल करत इजिप्तला १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. अर्जेंटिनाला सामन्यात पुनरागमन करण्याची सुवर्णसंधी २१ व्या मिनिटाला मिळाली. परंतु, स्टार खेळाडू लिओनेल मेस्सी पेनल्टीवर गोल करण्यात अपयशी ठरला, ज्यामुळे अर्जेंटिनावरील दबाव आणखी वाढला. उत्तरार्धात इजिप्तच्या मोस्तफा जिकोने ६७ व्या मिनिटाला दुसरा गोल डागला आणि इजिप्तची आघाडी २-० अशी मजबूत केली. या क्षणाला अर्जेंटिना विश्वचषकातून बाहेर पडणार असेच वाटत होते. ६७ मिनिटांपर्यंत २-० ने मागे असलेल्या अर्जेंटिनाने हार मानली नाही. त्यांनी अशा प्रकारे खेळ फिरवला की संपूर्ण स्टेडियम अवाक झाले. अर्जेंटिनाच्या पुनरागमनाची सुरुवात ७९ व्या मिनिटाला झाली, जेव्हा ख्रिस्तियन रोमेरोने गोल करून स्कोअर २-१ केला.

# ट्रम्पच्या वक्तव्यानंतर भारतीय शेअर बाजार क्रॅश, गुंतवणूकदारांचे ८ लाख कोटी बुडाले

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय शेअर बाजारात बुधवारी दुपारनंतर अचानक मोठी घसरण सुरु झाली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतची शस्त्रसंधी संपल्याचं जाहीर करताच सेन्सेक्स आणि निफ्टी क्रॅश झाले. निफ्टी ५० निर्देशांक २३८९७ अंकावर बंद झाला, तर, सेन्सेक्स १६५८ अंकांनी घसरुन ७६५२२ अंकांवर बंद झाला. बँक निफ्टीमध्ये १४५८ अंकांची घसरण होऊन निर्देशांक ५६७४२ वर बंद झाला. त्यामुळे बुधवारी गुंतवणूकदारांचे जवळपास ८ लाख कोटींचे नुकसान झाले आहे.



बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४८० लाख कोटींवरुन घसरुन ४७२ लाख कोटींवर आलं आहे. म्हणजेच जवळपास गुंतवणूकदारांचं एका दिवसात ८ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. शेअर बाजारातील प्रमुख १६ सेक्टर्स पैकी १३ सेक्टरमध्ये घसरण झाली. स्मॉल कॅप आणि मिड कॅप ०.०३ टक्क्यांनी घसरले.

भारतीय शेअर बाजाराची बुधवारची सुरुवात घसरणीसह झाली होती. दुपारपर्यंत निर्देशांकावर दबाव होता. बँकिंग शेअरमधील घसरणीमुळं बँक निफ्टीत घसरणीसह ट्रेडिंग सुरु होतं. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुपारी इराण सोबतची शस्त्रसंधी संपल्याचं जाहीर करताच क्रूड ऑईलचे दर ७८ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. यामुळं शेअर बाजारात घसरण झाली.

आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम झाल्यानं स्मॉल कॅप, लार्ज कॅप शेअरमध्ये देखील घसरण झाली. सर्वाधिक घसरण जिओ फायनान्शिअल, श्रीराम फायनान्स, इंटरग्लोब एविएशन, यूनियन बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी असेटस मॅनेजमेंट, मारुती सुझुकीच्या शेअरमध्ये घसरण झाली.

निफ्टीच्या जवळपास सर्व निर्देशांकात घसरण झाली. निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक १.९७ टक्क्यांनी घसरला. तर, निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांक १.५७ टक्क्यांनी घसरला. ऑईल अँड गॅस निर्देशांक १.५ टक्क्यांनी घसरला. शेअर बाजारात तेल विपणन कंपन्या, रंग बनवणाऱ्या कंपन्या, हवाई वाहतूक कंपन्या आणि टायर बनवणाऱ्या कंपन्यांच्या शेअरमध्ये घसरण झाली आहे.

# व्यापारी कासलीवाल यांना १ कोटी ६२ लाखांचा ऑनलाईन गंडा

## शेअर मार्केटमध्ये दामदुप्पटचे अमिष दाखवून फसवणूक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या उच्चभ्रू वस्तीमध्ये राहणाऱ्या एका व्यावसायिकाला शेअर मार्केटमध्ये अधिकचा नफा मिळवून देतो असे आमिष दाखवत तब्बल १ कोटी ६२ लाख ५० हजार रुपयांचा गंडा घालणाऱ्या तिघांविरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहराच्या विसावानगर भागात राहणारे शिरीष बाबुलाल कासलीवाल (वय ५९) यांना



ऑनलाईन माध्यमाद्वारे रूप बुथरा, शिवानी गेरा आणि कोटक्षेत्र ग्रुप डमिन यांनी संगणमत करून दि. २३ एप्रिल २०२६ ते ६ जुलै २०२६ च्या दरम्यान शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविल्यास अधिक नफा मिळवून देतो असे आमिष दाखवून विश्वासात घेतले. शिरीष कासलीवाल यांनी अमिषापोटी १ कोटी ६२ लाख ५० हजार रुपये तिघांच्या बँक खात्यात वर्ग केले. परंतु कुठलाही अधिक नफ्याचा परतावा मिळाला नाही, उलट मूळ रक्कमही देण्यास वरील आरोपींनी टाळाटाळ केली. त्यानंतर आरोपींनी आपला भ्रमणध्वनीही बंद केला. अखेर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर शिरीष कासलीवाल यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात असलेल्या सायबर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून रुप बुथरा, शिवानी गेरा आणि कोटक्षेप ग्रुप डमिन या तिघांविरुद्ध फसवणूक आणि माहिती तंत्रज्ञान कलम न्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक वसंत सप्रे करत आहेत.

# मनपाचे विरोधी पक्षनेते मसूद खान यांच्या नियुक्तीला स्थगिती

## काँग्रेस आणि 'वंचित'ने हायकोर्टात केली होती याचिका दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेचे विरोधी पक्षनेते मसूद खान यांच्या नियुक्तीला मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. याबाबत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने हायकोर्टात याचिका दाखल केली होती.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे पंधरा नगरसेवक आहेत. त्याच पाठोपाठ एम आयएचे चौदा नगरसेवक असून दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी विरोधी पक्षनेता पदावर दावा केला होता. काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीकडून विरोधी पक्षनेतेपदासाठी माजी उपमहापौर अब्दुल गफार यांच्या नावाची शिफारस महापौर कविता मुळे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली होती. तसेच एमआयएम नेही नगरसेवक मसूद खान यांची शिफारस महापौरांकडे केली होती.

विरोधी पक्ष नेतेपदाच्या नियुक्तीचा विषय हा महापौरांच्या अधिनस्त असल्याने त्यांनी अधिकाराचा वापर करुन विरोधी पक्षनेतेपदी एमआयएमचे मसूद खान यांची नियुक्ती केली होती. महापौर कविता मुळे यांनी घेतलेल्या निर्णयाला काँग्रेसचे नगरसेवक अब्दुल गफार



व वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी होऊन न्यायालयाने बुधवारी विरोधी पक्षनेते मसूद खान यांच्या नियुक्तीला स्थगिती दिली आहे.

## सेट परीक्षा पुन्हा लांबणीवर

**पुणे (प्रतिनिधी)–** सहायक प्राध्यापक पदासाठी २६ जुलै रोजी प्रस्तावित असलेली राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा, आषाढी वारीमुळे उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, ६ सप्टेंबर ही परीक्षेची संभाव्य तारीख जाहीर करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती दिली. विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा घेण्यासाठी प्राधिकृत विभाग आहे. सेट विभाग हा राज्य शासनाची समन्वयक संस्था, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्र, गोवा राज्यात सेट परीक्षा आयोजित केली जाते. त्यानुसार ४१वी सेट परीक्षा २६ जुलै रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, २६ जुलै रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवा भरतीअंतर्गत विविध विषयांच्या परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत.

# एसटी महामंडळाचा कायापालट होणार; जुन्या बसेस बदलून ताफ्यात ई-बसेस येणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** भविष्यात एसटी बसेसची कालमर्यादा १५ वर्षांवरून थेट ८ वर्षांवर आणण्याचे सरकारचे धोरण असून, कालबाह्य होणाऱ्या जुन्या बसेसच्या जागी मोठ्या प्रमाणावर अत्याधुनिक ई-बसेस (ईव्ही) ताफ्यात सामील केल्या जाणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मंत्री सरनाईक यांनी सभागृहात केली.

विधानपरिषदेत बुधवारी प्रश्नोत्तराच्या तासात एसटी महामंडळाच्या बसेसची स्थिती, प्रवाशांची सुरक्षा आणि वाढत्या अपघातांवर आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अत्यंत सकारात्मक आणि सविस्तर उत्तरे दिली. शासनाने एसटी महामंडळाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी अनेक दूरगामी व अत्याधुनिक उपाययोजना जाहीर केल्या आहेत.

आमदार प्रवीण दरेकर यांनी पालघर, डहाणू आणि महाड आगारातील बसेसच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधत ग्रामीण भागातील बसेस बदलण्यासाठी 'टाईम बाउंड' (कालबद्ध) कार्यक्रम राबवण्याची मागणी केली होती. या सूचनेला सकारात्मक प्रतिसाद देत मंत्र्यांनी स्पष्ट केले की, ग्रामीण भागातील जुन्या बसेस बदलण्याच्या मोहिमेत पालघर आणि डहाणू आगाराला प्राधान्य दिले जाईल. शासनाने बसेस मोडीत (स्क्रॅप) काढण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखला असून त्यानुसार वर्ष २०२७-२८ मध्ये २,१८३ बसेस, २०२८-२९ मध्ये २,८९० बसेस आणि २०२९-३० मध्ये १,४७२ बसेस ताफ्यातून बाद करून त्याजागी नवीन वाहने आणली जातील. तसेच, महाराष्ट्रातील मुख्य कार्यशाळा (गॅरेजेस) अतिशय उत्तम स्थितीत असून तांत्रिक कर्मचारी वाहनांच्या देखभालीसाठी अहोरात्र सक्षमपणे काम करत आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. तसेच सभागृहात अपघातांच्या आकडेवारीबाबत बोलताना मंत्र्यांनी प्रामाणिकपणे वस्तुस्थिती मांडली आणि सरकार चालकांच्या प्रशिक्षणाबाबत कमालीचे गंभीर असल्याचे सांगितले.

# शरद पवार प्रदीर्घ कालावधीनंतर विधानभवनात, उपमुख्यमंत्री शिंदे कॅबिनेट सोडून थेट भेटीला


**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार बुधवारी प्रदीर्घ कालावधीनंतर विधानभवनात पोहोचले. त्यांच्या स्वागतासाठी अनेक नेते पोहोचले. शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या विधानभवनातील कक्षात येऊन सदिच्छा भेट घेतली. कर्नाटक महाराष्ट्र सीमा प्रश्नावरील उच्चाधिकार समितीची बैठक संपल्यावर शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांची त्यांच्या दालनात भेट घेतली.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पवार यांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. बेळगाव सीमा प्रश्नी विधीमंडळात बुधवारी उच्चस्तरीय बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, माजी मुख्यमंत्री नारायण राणे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार उपस्थित होत्या. तत्पूर्वी, विधानभवन परिसरात आगमन झाल्यानंतर शरद पवारांच्या स्वागतासाठी अनेक मंत्री आमदार पोहोचले.

दरम्यान, सीमा प्रश्नाव बैठक पार पडल्यानंतर शरद पवार यांनी आमदारांसोबत बैठक घेतली. या बैठकीला १० पैकी ९ आमदार उपस्थित होते. जवळपास अर्धा तास आमदारांसोबत बैठक पार पडली. मात्र, मुंबईत असून



देखील रोहित पवार बैठकीला गैरहजर राहिल्याने राजकीय भूवया उंचावल्या. विधानभवनात शरद पवारांच्या उपस्थित राष्ट्रवादीच्या आमदारांची बैठक सरु असताना दुसरीकडे आझाद मैदानातील शिक्षक आंदोलनाला रोहित पवार यांची उपस्थिती चर्चेचा विषय ठरला. रोहित पवार यांनी स्वतः ट्विट करत आपण शिक्षक आंदोलनाला उपस्थित राहणार आहोत. मात्र, शरद पवार विधिमंडळात येणार असल्याने आपण उशिरा आंदोलन स्थळी पोहोचू अस म्हंटलं होतं.





## टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील भारताचा सर्वात मोठा पराभव!

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील तिसऱ्या सामन्यात टीम इंडियाला लाजीरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला आहे. इंग्लंडने हा सामना १२५ धावांच्या फरकाने जिंकत मालिकेत २-० अशी अजेय आघाडी घेतली आहे. आयर्लंड दौऱ्यापासून सुरू झालेला भारताचा पराभवाचा सिलसिला या सामन्यातही कायम राहिला. या सामन्यात गोलंदाजीपासून फलंदाजीपर्यंत भारतीय संघाची पूर्णपणे दाणादाण उडाली. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने २० षटकांत ७ बाद २०१ धावांचा डोंगर उभा होता.

# मुंबईतील प्रसिद्ध आईस्क्रीमचा परवाना रद्द, उंदीर आणि माशांचा वावर; १६ ठिकाणी छापेमारी, तुकाराम मुंढेंचा दणका!

**मुंबई (प्रतिनिधी)–** आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी प्रसिद्ध असलेले आयएएस अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारताच अन्न भेसळ आणि अस्वच्छतेविरुद्ध मोठी मोहीम उघडली आहे. एफडीएच्या पथकाने एकाच दिवशी तब्बल १६ नामांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि ढाब्यांवर अचानक छापेमारी केली. या धडक कारवाईत मुंबईतील नरिमन पॉईंट परिसरातील अत्यंत प्रसिद्ध आणि ऐतिहासिक 'रुस्तम आईस्क्रीम' दुकानाला मोठा दणका देत त्यांचा परवाना तात्काळ निलंबित केला आहे.

या मोहिमेमुळे राज्यातील



हॉटेल व्यावसायिक आणि अन्न उत्पादकांचे धाबे दणाणले आहेत. एकाच दिवसात झालेल्या या मोठ्या कारवाईत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत.

नरिमन पॉईंट येथील 'रुस्तम अँड कंपनी' हे मुंबईतील ग्राहकांचे आणि पर्यटकांचे अत्यंत आवडते आणि जुने आईस्क्रीम केंद्र मानले जाते. मात्र, एफडीएच्या पथकाने जेव्हा या ठिकाणी तपासणी केली, तेव्हा तिथली दुरवस्था पाहून अधिकारीही चक्रावले.

अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर केवळ दंडात्मक नव्हे, तर फौजदारी कारवाई देखील करण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान राज्यभरातून तब्बल ९ लाख ६० हजार ४१६ रुपये किमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थ, पान मसाला आणि गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला आहे.

या बेकायदेशीर विक्री, वितरण आणि वाहतूक प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून, एका आरोपीला पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांची गय केली जाणार नाही; हॉटेल्स आणि अन्न व्यावसायिकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा यापुढील काळात याहूनही कडक कारवाई केली जाईल, असा इशारा एफडीए प्रशासनाने दिला आहे.

तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार एफडीएने केवळ मुंबईतच नव्हे, तर राज्यभरात ही मोहीम राबवली आहे. एकाच दिवसात १६ ठिकाणी छापा मारण्यात आला आहे.

## राज्यातील २ लाख आदिवासींना मिळणार 'सातबारा'

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील लाखो आदिवासी आणि पारंपरिक वननिवासी बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा अत्यंत क्रांतिकारक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर आता आदिवासींना स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना १२ ई लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केली. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील २ लाखांपेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांच्या हक्काचा मार्ग मोकळा झाला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार


संपादक
केशव घोणसे पाटील


# इथेनॉल धोरण : कोणाच्या फायद्याचे?

देशातील इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, कॉर्बन उत्सर्जनात घट घडवून आणणे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नवा बाजार उपलब्ध करून देणे या उद्देशाने केंद्र सरकारने इथेनॉल मिश्रित पेट्रोलची अंमलबजावणी नियोजित वेळेपेक्षा लवकर केली. या निर्णयामागील उद्दिष्टे निश्चितच दूरदृष्टीची आणि राष्ट्रीय हिताची मानली जाऊ शकतात. मात्र, कोणतेही धोरण राबविताना त्याचा सर्वाधिक परिणाम सामान्य नागरिकांवर होत असतो. त्यामुळे ग्राहकांची तयारी, वाहनांची तांत्रिक क्षमता आणि पर्यायी व्यवस्था यांचा पुरेसा विचार झाला का, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे. इथेनॉल मिश्रित पेट्रोलमुळे देशाचे अब्जावधी डॉलर्सचे कच्च्या तेलावरील आयात बिल कमी होईल, तसेच हवामान बदलाच्या लढ्यात भारताची प्रतिमा अधिक बळकट होईल, असा सरकारचा दावा आहे. ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगालाही या धोरणामुळे मोठा आर्थिक आधार मिळत आहे. त्यामुळे कृषी आणि ऊर्जा या दोन्ही क्षेत्रांना एकाच वेळी चालना देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. या दृष्टीने पाहता, हे धोरण व्यापक आर्थिक हिताचे वाटते. परंतु या यशामागे सामान्य वाहनधारकांना मोजावी लागणारी किंमत दुर्लक्षित करता येणार नाही. देशातील बहुतांश दुचाकी आणि चारचाकी वाहने अशा इंधनासाठी तांत्रिकदृष्ट्या तयार नाहीत. अशा वाहनांमध्ये इंधन कार्यक्षमतेत घट, इंजिनमधील रबरी भागांचे नुकसान, इंधन वाहिन्यांमध्ये गंज आणि देखभालीच्या वाढत्या खर्चाच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. वाहनाचे मायलेज कमी झाल्याने ग्राहकांना अधिक इंधन खरेदी करावे लागत असून, त्यामुळे प्रत्यक्ष आर्थिक भार वाढत आहे. यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे ग्राहकांसमोर कोणताही पर्याय उपलब्ध नाही. अमेरिका आणि युरोपसारख्या विकसित देशांमध्ये इथेनॉल मिश्रित पेट्रोलबरोबरच साधे पेट्रोलही उपलब्ध असते. त्यामुळे ग्राहक आपल्या वाहनानुसार इंधनाची निवड करू शकतात. भारतात मात्र अशी निवडीची संधी उपलब्ध नसल्याने लाखो वाहनधारकांना अनिवार्यपणे दिल्या जाणाऱ्या भेसळयुक्त इंधनाचा वापर करावा लागत आहे. विशेष म्हणजे, इथेनॉलची किंमत शुद्ध पेट्रोलपेक्षा कमी असतानाही त्याचा लाभ ग्राहकांना मिळालेला दिसत नाही. उलट मायलेज घटल्यामुळे आणि वाहनांच्या देखभालीचा खर्च वाढल्यामुळे वाहनधारकांचा एकूण खर्च वाढत आहे. जुन्या वाहनांच्या पुनर्विक्री मूल्यावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे चित्र आहे. निश्चितच ऊर्जा स्वावलंबन आणि पर्यावरण संरक्षण ही देशासाठी अत्यंत महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. मात्र, अशा धोरणांची अंमलबजावणी करताना जनतेचा विश्वास आणि सहभाग मिळविणे तेवढेच आवश्यक असते. वाहन उद्योग, ग्राहक संघटना आणि तज्ज्ञ यांच्याशी व्यापक चर्चा करून संक्रमणाचा कालावधी अधिक व्यावहारिक ठेवता आला असता. जुन्या वाहनांसाठी सवलती, अनुदान किंवा पर्यायी इंधनाची उपलब्धता यासारख्या उपाययोजनाही आवश्यक होत्या. पण तसे झाल्याचे दिसत नाही. सरकारने दीर्घकालीन राष्ट्रीय हिताचा विचार करून इथेनॉल धोरण स्वीकारले असले, तरी त्याची किंमत सामान्य ग्राहकांना अन्यायकारक पद्धतीने मोजावी लागत आहे, याची काळजी घेणे हीदेखील शासनाची तितकीच मोठी जबाबदारी आहे. विकास आणि पर्यावरण संरक्षणाचा मार्ग जनहिताला डावलून नव्हे, तर जनतेचा विश्वास संपादन करूनच यशस्वी होऊ शकतो. इथेनॉल धोरणाचा खरा विजय तेव्हाच मानला जाईल, जेव्हा सरकार, शेतकरी आणि ग्राहक या तिन्ही घटकांना त्याचा समान लाभ मिळेल.

# मुंबई शेअर बाजार : प्रवास वडापासून डिजिटलपर्यंत

९ जुलै १८७५ मध्ये मुंबई शेअर बाजाराची व्यापारी प्रेमचंद्र रॉयचंद यांनी स्थापना केली. मुंबई शेअर बाजाराची सुरुवात अत्यंत साध्या पद्धतीने झाली. इ.स. १८५०-१८६० च्या सुमारास मुंबईतील काही दलाल टाउन हॉल परिसरातील वडाच्या झाडाखाली एकत्र येऊन शेअर्सची खरेदी-विक्री करत असत. त्यावेळी कोणतेही अधिकृत कार्यालय किंवा आधुनिक सुविधा नव्हत्या. दलाल प्रत्यक्ष भेटून मोठ्याने बोली लावून व्यवहार निश्चित करत असत. हे व्यवहार मुख्यतः परस्पर विश्वास आणि तोंडी करारांवर आधारित होते. अशा साध्या सुरुवातीतून पुढे मुंबई शेअर बाजाराची स्थापना झाली आणि तो आज जगातील महत्त्वाच्या शेअर बाजारांपैकी एक बनला.



शेअर व्यवहारांची संख्या वाढू लागल्याने दलालांनी व्यवहार अधिक शिस्तबद्ध आणि सुरक्षित करण्यासाठी संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १८७५ मध्ये द नेटिव्ह शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनची स्थापना करण्यात आली. पुढे याच संस्थेचे मुंबई शेअर बाजार असे नामकरण झाले. हा आशियातील सर्वात जुना शेअर बाजार मानला जातो. या संघटनेमुळे शेअर व्यवहारांना नियमबद्ध स्वरूप मिळाले आणि गुंतवणूकदारांचा विश्वासही वाढला.

शेअर व्यवहारांचे प्रमाण वाढू लागल्याने स्वतंत्र इमारतीची आवश्यकता निर्माण झाली. पुढे मुंबईतील दलाल स्ट्रीट ही मुंबई शेअर बाजाराची ओळख बनली. देशभरातील अनेक कंपन्या येथे सूचीबद्ध होऊ लागल्या. त्यामुळे गुंतवणूकदारांची संख्या आणि व्यवहारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. भारतीय उद्योगांना भांडवल उपलब्ध करून देण्यात आणि देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात मुंबई शेअर बाजाराने महत्त्वाची भूमिका बजावली.

पूर्वी शेअर्स कागदी प्रमाणपत्रांच्या स्वरूपात दिले जात असत. शेअर्सची खरेदी-विक्री आणि मालकी हस्तांतरणासाठी अनेक दिवस, कधी कधी आठवडेही लागत असत. कागदी प्रमाणपत्रे हरवणे, बनावट शेअर्स तयार होणे आणि हस्तांतरणात विलंब होणे अशा अनेक अडचणी निर्माण होत असत. तसेच प्रत्येक व्यवहारासाठी मोठ्या प्रमाणावर कागदपत्रांची पूर्तता करावी लागत असल्याने प्रक्रिया वेळखाऊ आणि किचकट होती.

१९९० च्या दशकात मुंबई शेअर बाजारात संगणकाचा वापर सुरू झाला आणि शेअर व्यवहारात मोठी क्रांती घडली. संगणकीकरणामुळे व्यवहार अधिक वेगवान, अचूक आणि सुरक्षित झाले. माहितीचे व्यवस्थापन डिजिटल पद्धतीने होऊ लागल्याने नोंदी ठेवणे आणि व्यवहार तपासणे सोपे झाले. तसेच मानवी चुका कमी झाल्या, पारदर्शकता वाढली आणि गुंतवणूकदारांचा शेअर बाजारावरील विश्वास अधिक दृढ झाला.

इंटरनेटच्या आगमनामुळे शेअर बाजारात ऑनलाइन ट्रेडिंगची सुरुवात झाली. त्यामुळे गुंतवणूकदारांना घरबसल्या संगणक किंवा मोबाईल अॅपद्वारे शेअर्सची खरेदी-विक्री करणे शक्य झाले. यामुळे दलालांच्या कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली. काही सेकंदांत व्यवहार पूर्ण होऊ लागल्याने वेळेची बचत झाली आणि व्यवहार अधिक सोपे व सुरक्षित झाले. तसेच देशाच्या कोणत्याही भागातील गुंतवणूकदारांना शेअर बाजारात समान संधी उपलब्ध झाली

शेअर बाजाराच्या आधुनिकीकरणामध्ये डिमॅट प्रणाली हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. पूर्वी शेअर्स कागदी प्रमाणपत्रांच्या स्वरूपात ठेवले जात असल्यामुळे त्यांचे जतन करणे, हस्तांतरण करणे आणि व्यवहार पूर्ण करणे ही प्रक्रिया वेळखाऊ व किचकट होती. कागदी प्रमाणपत्रे हरवणे, खराब होणे, चोरी होणे किंवा बनावट प्रमाणपत्रांचा वापर होणे अशा अनेक समस्या निर्माण होत असत. त्यामुळे गुंतवणूकदारांना आर्थिक नुकसान सहन करावे लागण्याची शक्यता होती.

या अडचणी दूर करण्यासाठी डिमॅट प्रणाली सुरू करण्यात आली. या प्रणालीमध्ये शेअर्स कागदी स्वरूपाऐवजी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात डिमॅट खात्यात ठेवले जातात. त्यामुळे शेअर्सची सुरक्षितता मोठ्या प्रमाणात वाढली. गुंतवणूकदारांना आपल्या गुंतवणुकीची माहिती कोणत्याही वेळी ऑनलाईन पाहता येऊ लागली. शेअर्स खरेदी-विक्री, हस्तांतरण आणि नोंदणी या सर्व प्रक्रिया संगणकीय पद्धतीने होऊ लागल्याने व्यवहार अधिक जलद, अचूक आणि पारदर्शक झाले.

डिमॅट प्रणालीमुळे शेअर्स हरवण्याचा, फाटण्याचा किंवा खराब होण्याचा धोका पूर्णपणे दूर झाला. तसेच कागदपत्रांची गरज कमी झाल्याने वेळ आणि खर्चाचीही बचत झाली. व्यवहार काही मिनिटांत पूर्ण होऊ लागल्याने गुंतवणूकदारांचा वेळ वाचला आणि शेअर बाजारावरील विश्वास अधिक दृढ झाला. ऑनलाईन ट्रेडिंगसोबत डिमॅट प्रणालीमुळे गुंतवणूक प्रक्रिया अधिक सोपी आणि सर्वसामान्यांसाठी सुलभ झाली.

आज प्रत्येक गुंतवणूकदारासाठी डिमॅट खाते अत्यावश्यक मानले जाते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेअर व्यवहार अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि कार्यक्षम झाले आहेत. त्यामुळे भारतातील शेअर बाजाराच्या विकासात डिमॅट प्रणालीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली असून, डिजिटल युगातील शेअर व्यवहारांचा तो एक मजबूत पाया ठरला आहे

आजच्या डिजिटल युगात मुंबई शेअर बाजाराने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून मोठी प्रगती केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, अल्गोरिदमिक ट्रेडिंग आणि क्लाउड तंत्रज्ञानामुळे शेअर व्यवहार अधिक वेगवान, अचूक आणि सुरक्षित झाले आहेत. पूर्वी व्यवहार पूर्ण होण्यासाठी बराच वेळ लागत असे, परंतु आता काही सेकंदांतच खरेदी-विक्रीची प्रक्रिया पूर्ण होते.

इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वापरामुळे गुंतवणूकदारांना मोबाईल अॅप किंवा संगणकाच्या माध्यमातून जगातील कोणत्याही ठिकाणाहून शेअर्सची खरेदी-विक्री करता येते. रिअल-टाइम बाजारभाव, चार्ट, आर्थिक बातम्या आणि तज्ज्ञांचे विश्लेषण सहज उपलब्ध असल्यामुळे गुंतवणुकीचे निर्णय अधिक माहितीपूर्ण पद्धतीने घेता येतात. त्यामुळे शेअर बाजार अधिक पारदर्शक आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी सुलभ झाला आहे.

आज जागतिक अर्थव्यवस्थेतील बदल, आंतरराष्ट्रीय घडामोडी, सरकारी धोरणे आणि मोठ्या कंपन्यांचे आर्थिक निकाल यांचा परिणाम त्वरित शेअर बाजारावर दिसून येतो. त्यामुळे गुंतवणूकदारांना सतत अद्ययावत माहिती ठेवणे आवश्यक झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे मुंबई शेअर बाजार जागतिक दर्जाचा बनला असून, भारताच्या आर्थिक विकासात त्याची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे.

डिजिटल युगामुळे मुंबई शेअर बाजाराच्या कार्यपद्धतीत मोठे सकारात्मक बदल झाले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेअर व्यवहार अधिक वेगवान, अचूक आणि पारदर्शक झाले आहेत. व्यवहार काही सेकंदांत पूर्ण होत असल्याने गुंतवणूकदारांचा वेळ वाचतो आणि मानवी चुका कमी होतात. ऑनलाईन ट्रेडिंग आणि डिमॅट प्रणालीमुळे व्यवहाराचा खर्चही कमी झाला असून, गुंतवणूक करणे अधिक सोपे झाले आहे.

डिजिटल माध्यमांमुळे शेअर बाजाराशी संबंधित माहिती, रिअल-टाइम बाजारभाव, चार्ट, आर्थिक बातम्या आणि तज्ज्ञांचे विश्लेषण सहज उपलब्ध होते. त्यामुळे गुंतवणूकदार योग्य वेळी योग्य निर्णय घेऊ शकतात. इंटरनेट आणि मोबाईल अॅप्समुळे देशभरातील तसेच परदेशातील गुंतवणूकदारही सहजपणे भारतीय शेअर बाजारात सहभागी होऊ शकतात. यामुळे गुंतवणूक वाढते, उद्योगांना भांडवल उपलब्ध होते आणि देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. त्यामुळे डिजिटल युग हे मुंबई शेअर बाजाराच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

डिजिटल युगामुळे शेअर बाजार अधिक आधुनिक आणि गतिमान झाला असला, तरी त्यासोबत काही महत्त्वाची आव्हानेही निर्माण झाली आहेत. ऑनलाईन व्यवहार वाढल्यामुळे सायबर हल्ले, हॅकिंग आणि डेटा चोरीचा धोका वाढला आहे. तसेच बनावट गुंतवणूक योजना, फसव्या वेबसाइट्स आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीमुळे अनेक गुंतवणूकदारांची दिशाभूल होण्याची शक्यता असते.

याशिवाय, शेअर बाजारातील तीव्र चढ-उतारांमुळे गुंतवणूकदारांना आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. सोशल मीडिया किंवा अप्रमाणित स्रोतांवरून मिळणाऱ्या चुकीच्या माहितीमुळे अनेकदा चुकीचे गुंतवणुकीचे निर्णय घेतले जातात. तसेच संपूर्ण व्यवहार तंत्रज्ञानावर अवलंबून असल्याने इंटरनेट किंवा संगणक प्रणालीमध्ये बिघाड झाल्यास व्यवहारांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे डिजिटल युगातील सुविधांचा लाभ घेताना सुरक्षितता, योग्य माहिती आणि सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे.

मुंबई शेअर बाजाराचा प्रवास वडाच्या झाडाखाली चालणाऱ्या साध्या आणि छोट्या व्यवहारांपासून आजच्या अत्याधुनिक डिजिटल ट्रेडिंगपर्यंत अत्यंत प्रेरणादायी आहे. सुरुवातीला मर्यादित साधनसामग्री आणि विश्वासावर आधारित व्यवहारांपासून सुरू झालेला हा प्रवास आज जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाधारित बाजारात रूपांतरित झाला आहे.

आज मुंबई शेअर बाजार हा भारताच्या आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ मानला जातो. उद्योगांना भांडवल उपलब्ध करून देणे, गुंतवणूकदारांना संधी उपलब्ध करून देणे आणि अर्थव्यवस्थेला गती देणे या सर्व बाबतीत त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेअर व्यवहार अधिक सुरक्षित, जलद, पारदर्शक आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी सुलभ झाले आहेत. त्यामुळे मुंबई शेअर बाजाराचा हा प्रवास भारताच्या आर्थिक प्रगतीचे प्रतीक ठरतो.


**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८


# टीईटी पेपरफुटी; राजकारण की गुन्हेगारी?

अलिकडील काळात शिक्षकांचीही गुन्हेगारी वाढत चालली असल्याचे हे पेपरफुटी आणि शालार्थ आयडी घोटाळ्यातून दिसून येते. शालार्थ आयडी घोटाळ्यात बऱ्याच शिक्षकांनी घोटाळे करुन नोकरी मिळविलेली आहे. तसेच अलिकडील काळात ज्या शाळेत शिक्षक नियुक्त होतात त्याच शाळेत त्यांचा मुखिया असलेला मुख्याध्यापक शिक्षकांकडून देण घेतो, शाळा चालविण्यासाठी पैसा लागतो असं कारण सांगून तसाच संस्थाचालकही मुख्याध्यापकामार्फत शिक्षकांना वेठीस धरुन लुटत असतो. ज्या मुख्याध्यापक व संस्थाचालकांना काही शिक्षक हे मदत करीत असतात. शिक्षक करीत असलेले कृत्य म्हणजे गुन्हेगारीच असते. त्यातच काही शाळेतील शिक्षक हे अलिकडील काळात राजकारण करायलाही लागले. ते आपल्या विद्यार्थ्यांना शाळेत शिकवायलाच जात नाहीत. घरीच किंवा तालुक्याला पडलेले असतात. हे चित्र दुर्गम भागातील शाळेत जास्त दिसतं. तिथं तपासणी करायला अधिकारी वर्ग जात नाही आणि गेलेच तर त्या शाळेतील शिक्षक राजकारण करुन सर्व प्रकारचा अपुरेपणा झाकून घेतात. ही गुन्हेगारीच असते. तशीच मुख्य गुन्हेगारी म्हणजे बरेचसे शिक्षक शाळा सुटली की गावाशेजारी असलेल्या बारमध्ये बसतात. हीही गुन्हेगारीच असते.

तसेच आणखी एक गुन्हेगारीचं प्रकरण म्हणजे मोनिका किरणापुरे हत्या प्रकरण. ज्या प्रकरणात मुखिया एक शिक्षकच होता. हे सर्व घडत असतं शिक्षण क्षेत्रात असलेल्या काही खड्यांमुळं. ज्याप्रमाणे तांदळात खडे असतात. ज्यातून तांदळाचा भात बनवतांना अडचण येते. तशीच अडचण अशाही काही गुन्हेगार शिक्षकांमुळे येते. जे तांदळातील खडेच असतात. ज्यातून शिक्षण क्षेत्र बदनाम होत असतं. तसं पाहिल्यास शिक्षण क्षेत्र पवित्र असं क्षेत्र असून हे क्षेत्र बऱ्याच गुणवान, इमानदार व पारदर्शक शिक्षकांमुळं पवित्र आहे. ज्यांना टीईटी परेशान करीत आहे.

टीईटी पेपरफुटी, राजकारण की गुन्हेगारी. ते काहीही असो. परंतु या पेपरफुटीतून सिद्ध होत आहे की, शिक्षक टीईटी माध्यमातून आपली पात्रता सिद्ध करण्यात सक्षम नाही. त्याचं कारण आहे, त्यांचं शिक्षण क्षेत्रात झालेलं वय व त्यांची मागील काही दिवसांपूर्वीच सुटलेली अभ्यासाची सवय. त्यांना आता जास्तचा अभ्यास करण्याची सवय नाही आणि ते जास्त अभ्यास करुही शकतात. परंतु पुरेशी त्याच्याकडे सवडही नाही. मात्र न्यायालयाला त्यांची पात्रताच तपासायची आहे. ज्यातून टीईटीचा डाव रचला गेला आहे.

शिक्षकांचा टीईटी अभ्यास. शिक्षक टीईटीचा अभ्यास करायला लागले. हे जरी बरोबर असलं तरी त्यांना अभ्यास करताच येवू नये म्हणून शासनानं ज्याप्रमाणे त्याच्यामागे प्रशिक्षण लावलं. त्याचप्रमाणे त्यांना बीएलओचंही काम दिलं. अन् आता तर सांगूच नये. शाळा सुरु झाल्यानं विद्यार्थ्यांना शिकविणं आलंच. त्यातच सोबत बीएलओचंही काम. कुठून अभ्यास होईल बोळकं. कसा अभ्यास होईल. मात्र भीती ही शिक्षकांच्याच पाचवीला पुजलेली आहे. शिक्षक हा अतिशय भित्रा असल्यानं तो आंदोलन करायलाही पाहात नाही. दोन-चार फक्त सुरुवातीला येतात. बाकी आपल्याच घरी मजेत राहतात. विचार करतात की इतर शिक्षकांचं जे होईल तेच माझं होईल अन् होणार सर्वांचंच आहे. टीईटी माध्यमातून सर्वच शिक्षक घरी बसणार आहेत. कोणालाच टीईटी माफ करणार नाही.

शिक्षकांच्या अंगातील कौशल्यांचा खाजगी शाळेतही विकास होतो. परंतु केव्हा? जर तो संस्थाचालकांची मनधरणी करीत असेल तर किंवा तो त्यांचा नातेवाईक असेल तर.मात्र टीईटी परीक्षेच्या माध्यमातून हे शक्य होणार नाही. कारण टीईटीच ठरवणार आहे, खाजगी शाळेतील कोण शिक्षक शाळेत टिकून राहण्यास पात्र आहे व कोण शिक्षक पात्र नाही. जो टीईटी पास करेल, तोच तरेल. बाकीचे सर्व घरी बसतील. कारण टीईटी परीक्षा माध्यम हे अमूक अमूक व्यक्ती नातेवाईक वा अमूक अमूक व्यक्ती हा संस्थाचालकांचा जवळीक. असा भेदभाव करीत नाही. ती सरळ सरळ गुणवत्तेला प्राधान्य देते. यावरुनच वातावरण तापलं व त्याच वातावरणातून कदाचित पेपरफुटी झाली असेल. असा संशय व्यक्तही होवू शकतो. मात्र ते जरी राजकारण असलं तरी नोकरी जाण्याची भीती असल्यानंही पेपरफुटी झाली असेल. अशीही एक शंका येते.

टीईटी पेपरफुटी मागचं राजकारण. प्रकरण व कारण संशयास्पद आहे आणि पेपरफुटीची वास्तविकताही तशीच आहे. तसं पाहिल्यास अलिकडील काळात शिक्षण विभागात भ्रष्टाचार शिगेला पोहोचलेला आहे. शिक्षकांमधील गुन्हेगारी ही वाढत चाललेली आहे. जी पेपरफुटी तसेच शालार्थ आयडी घोटाळ्यामार्फत दिसली. एवढंच नाही तर निरागस, बेकसूर असलेल्या नागपुरातील मोनिका किरणापुरे हत्याप्रकरणातूनही ही गुन्हेगारी दिसलीच. त्या हत्येत मुख्य गुन्हेगार एक शिक्षकच होता. जो सहभागी होता.

टीईटीच्या परीक्षेचा पेपर फुटला. ही बातमी नीटच्या परीक्षेचा पेपर फुटल्यासारखीच आहे. ज्यातून नीटचा पेपर फुटल्यानंतर विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. याही परीक्षेचं गांभीर्य त्याच नीट परीक्षेच्या पेपर फुटण्यासारखंच आहे. हे जरी बरोबर असलं तरी शिक्षक आत्महत्या करणार नाही, नीटच्या परिक्षेसारख्या. कारण ते वयानं आणि अनुभवानं मोठे झाले आहेत. तसं पाहिल्यास या देशात सरकारच्या धोरणानं सर्वच स्तरातील लोकं आत्महत्या करीत सुटले आहेत. मग ते विद्यार्थी असो की शेतकरी. फक्त शिक्षक नावाचा एकच घटक सुटला आहे. त्याचीही आत्म हत्या घडली असती. परंतु तो सुशिक्षित आहे व त्यामुळं तो तसं करणार नाही.

महत्वाचं सांगायचं म्हणजे पेपर फुटतातच कसे? सर्व यंत्रणा सक्षम असतांना. शिवाय शिक्षकांच्याही पात्रता सिद्ध करणारे पेपर फुटावेत? ही शोकांतिकाच आहे. ज्यातून शिक्षक नावाच्या घटकावर इमानदारी, पारदर्शकपणा व विश्वासाबाबत प्रश्नचिन्हं उभं राहावं? ज्यातून शिक्षक नावाच्या घटकांना इमानदार म्हणण्याऐवजी कोणी त्यांना बेईमान म्हणून संबोधावे? त्यांच्या व्यवहारावर संशय निर्माण व्हावा? ही देखील शोकांतिकाच आहे. महत्वपूर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे की अलिकडील काळात शिक्षक नावाचा घटक गुन्हेगार बनत चाललेला असून हे सर्व शासनाच्या शिक्षकांसाठी राबविण्यात येत असलेल्या धोरणात्मक व्यवहारारामुळं होत आहे. हे विसरता कामा नये. त्यामुळं असं घडू नये म्हणून नक्कीच शासनानं आपली शिक्षकांना वेठीस धरणारी धोरणं व व्यवहार सुधरवावीत. जेणेकरुन शिक्षकात पारदर्शकता निर्माण होईल व शिक्षकांचे पेपर फुटणार नाहीत. हे तेवढंच खरं.

शिक्षक गुन्हेगार, याबाबतीत सांगताना द्रोणाचार्यांचं उदाहरण नक्कीच देता येईल. त्यांनी कर्णाला विद्या शिकवली नाही. एक शिक्षक असताना, त्यांनी एकलव्याचा अंगठा कापून घेवून गुन्हा केला, एक शिक्षक असताना. त्याला जबाबदार होतं हस्तिनापूरचं राजकारण व द्रोणाचार्यांचा स्वार्थ. हस्तिनापूरचं गुरुपद स्वीकारण्यापूर्वी द्रोणाचार्यनं बऱ्याचशा यातना भोगल्या होत्या. ज्यातून त्यांना व त्यांच्या परिवाराला उपासात दिवस काढावे लागले होते. हा स्वार्थ होता द्रोणाचार्यांचा. तसंच हस्तिनापूरातील राजकुमाराऐवजी इतर कोणालाच द्रोणाचार्यांनी विद्या शिकवू नये. नाहीतर नोकरी सोडावी लागेल. हे राजकारण होतं, द्रोणाचार्यांबाबत हस्तिनापूरचं. ज्यातून गुन्हेगारी घडली व द्रोणाचार्य हे गुन्हेगार ठरले. टीईटी पेपरफुटी, ही गुन्हेगारीच. परंतु ही गुन्हेगारी का घडली? त्याचं कारण आहे, कालच्या द्रोणाचार्यांच्या परिवारासारखं आजच्याही शिक्षकांच्या परीवारांना उपासात राहावं लागू नये. दुसरं कारण म्हणजे न्यायालयामार्फत आजच्या शिक्षकांच्या बाबतीत होत असलेलं राजकारण. ज्यातून कितीतरी कर्ण शिक्षणापासून वंचित राहिले तरी, सत्तेतील नेत्यांची चांदीच असावी ही भावना. कितीतरी एकलव्याचे अंगठेही कापले गेले तरी सत्ता करणाऱ्यांच्या तिजोरीत टीईटी माध्यमातून पैसा यावा ही भावना. जर टीईटी परीक्षेचा असाच पेपर फुटत राहिला किंवा याच माध्यमातून पात्र शिक्षक बाद होत राहिले तर उद्या निश्चितच शिक्षकांच्याही बऱ्याच आत्महत्या होऊ शकतील यात शंका नाही. त्यासाठी एकतर शिक्षक पात्रता परीक्षा बाद करावी किंवा पेपरफुटी तरी बंद करावी. ज्यातून पात्र शिक्षकांना मनःताप सोसावा लागतो. कारण ती काही शिक्षकांची खरी पात्रता तपासणारी परीक्षा नाही.


**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०


# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज जयंती. आज त्यांची १०१ वी जयंती. गुरुदत्तजींच्या १०१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख.

गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फुल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा...आरपार मधील बाबूजी धीरे चलना...सीआयडीमधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फुल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली.



केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते .

गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाच्या भरात झोपेच्या गोळ्या खाल्लया. त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

रहनेको सदा दहरमे आता नही कोई
तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई
एक बार तो मौत भी घबरा गई होगी
यू मौत को सिने से लगाता नहीं कोई


**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव मोजमाप व वितरण शिबिरास सीईओ महेश पाटील यांची भेट; लाभार्थ्यांशी साधला संवाद




**नांदेड (प्रतिनिधी)–** –दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी कृत्रिम हात–पाय व कॅलिपर्स आदी सहायक साधनांचे मोजमाप व वितरण शिबीर आज लोहा येथील ग्रामीण रुग्णालयात उत्साहात पार पडले. या शिबिराला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी भेट देऊन लाभार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी कृत्रिम पाय बसविण्यापूर्वी व बसविल्यानंतर काय ङ्गरक जाणवला, याबाबत लाभार्थ्यांशी संवाद साधला. त्यावर दिव्यांग लाभार्थ्यांनी कृत्रिम पायामुळे चालणे अधिक सोपे होणार असून दैनंदिन हालचालींमध्ये मोठी मदत मिळेल, असे सांगत समाधान व्यक्त केले. तसेच कृत्रिम हात बसविण्यात आलेल्या एका लाभार्थ्याने आता शेतीची कामे करण्यास मोठी मदत होणार असल्याची भावना व्यक्त केली.

दिव्यांग कल्याण विभाग, सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती, एस.आर. ट्रस्ट (मध्य प्रदेश) व लिमको (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे, गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरामध्ये अस्थिभंगग्रस्तांसाठी कृत्रिम पाय, मनगट व खांद्यापासून कृत्रिम हात, प्लास्टिक कॅलिपर्स तसेच दैनंदिन वापरासाठी स्पोर्ट्स शूज आदी सहायक साधनांचे मोजमाप व वितरण करण्यात आले. या शिबिरासाठी एकूण ९४ लाभार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६५ लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला.

# ८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**नांदेड (प्रतिनिधी)–** ८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघांतर्गत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण या मोहिमेअंतर्गत सर्व मतदान भागनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, हडको येथील फिरदोस मशीद परिसरात आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरामध्ये पात्र मतदार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी व ईएफ फॉर्म भरून घेण्यासाठी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. मतदान यादी अधिकाधिक अचूक व अद्ययावत करण्याच्या उद्देशाने ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी नांदेड तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ तसेच तहसीलदार नांदेड तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी संजय वारकड व सहायक मतदार नोंदणी अधिकारी अविनाश शिंगारे यांनी कॅम्पला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी, बीएलओ तसेच नागरिकांशी संवाद साधत मतदार नोंदणीची प्रक्रिया पारदर्शक, अचूक व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. ईएफ वाटप, संकलन व डिजिटायझेशन स्पीड अपलोड करण्यासाठी सूचना दिली आहे.

मतदारांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी नांदेड तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी केले.

# सिडको कार्यालयीन सहायकासह लिपीक पदे रिक्त, अनेक कामे प्रलंबित

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको नांदेड कार्यालयातील कार्यालयीन सहायकासह लिपीक पद गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त असल्याने कार्यालयीन कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. दैनंदिन पत्रव्यवहारही ठप्प झाला आहे. मुख्य प्रशासक छत्रपती संभाजी नगर यांनी तत्काळ सिडको नवीन नांदेड कार्यालयातील रिक्त पदे भरून प्रलंबित कामाचा निपटारा करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

नवीन नांदेड सिडको येथील कार्यालय येथे गेल्या अनेक वर्षांपासून प्रभारी प्रशासक कार्यरत असून, महिन्यातून किंवा दोन महिन्याला नांदेड कार्यालय येथे येत असत तर विकास अधिकारी हेही महिन्याला एक दिवस येत असत. त्यामुळे सिडको योजना क्रमांक १ ते ४ व मोंढा प्रकल्पासह अनेक भूखंडधारक यांची विविध कामे गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहेत. सध्या लेखा विभागातील लिपीक एकच कर्मचारी हे कार्यालयीन काम पाहत आहेत. त्यामुळे नागरिकांची कामे प्रलंबित आहेत.

# अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्तीतून विद्यार्थी ठरणार अपात्र; नियम कडक

**नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहायक आयुक्त, समाज कल्याण, कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृती योजना सन २०१८–१९ पासून ऑनलाईन महाडीबीटी प्रणालीद्वारे राबविली जाते. तथापि उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना घाईगडबडीत किंवा तात्पुरत्या स्वरूपात प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ही बातमी अत्यंत महत्त्वाची आहे. तांत्रिक कारणास्तव जर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला अभ्यासक्रम अर्धवट सोडला, तर त्यांना पुढील अभ्यासक्रमासाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्तीला मुकावे लागणार आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. तसेच अनेक विद्यार्थी बारावी उतीर्ण झाल्यानंतर वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी किंवा कृषी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रयत्न करतात.

मात्र, प्रवेश प्रक्रियेत अपेक्षित जागा न मिळाल्यास किंवा गॅप टाळण्यासाठी अनेक विद्यार्थी तात्पुरत्या स्वरूपात बीए, बीएससी किंवा बीकॉम–सारख्या बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. याच काळात विद्यार्थी महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतात आणि त्यांना लाभही मिळतो. परंतु पुढील शैक्षणिक वर्षात जेंव्हा या विद्यार्थ्यांची निवड प्रत्यक्ष हव्या असणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (उदा. अभियांत्रिकी, पॉलीटेक्निक) होते, तेंव्हा तांत्रिक नियमामुळे त्यांना शिष्यवृत्ती मिळणे कठीण होते. एकदा शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला अभ्यासक्रम पूर्ण न करता अर्धवट सोडल्यास नवीन अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा अर्ज तांत्रिकदृष्ट्या सदर विद्यार्थी अपात्र ठरतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी खबरदारी घेऊनच प्रवेश घ्यावा आणि अभ्यासक्रम पूर्ण करावा, असे कळविण्यात आले आहे.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे देगलूर येथे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व अक्का महादेवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था देगलूरच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. ८ जुलै २०२६ रोजी अक्का महादेवी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था देगलूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्हचे (जागेवर निवड संधी) रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापना, हॉस्पिटलमध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी ८ जुलै रोजी सकाळी ११ वा. पासून अक्का महादेवी शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था देगलूर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आनंदनगर रोड बाबानगर नांदेड संपर्क ईमेल आयडी nandedrojgar01gmail.com दूरध्वनी क्रमांक ०२४६२–२५१६७४ येथे संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# हजूर साहिब नांदेड–टनकपूर–हजूर साहिब नांदेड साप्ताहिक एक्सप्रेसची नियमित सेवा सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रवाशांना अधिक सुलभ, आरामदायी आणि थेट रेल्वे प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेने गाडी क्रमांक १७६३१/१७६३२ हजूर साहिब नांदेड–टनकपूर–हजूर साहिब नांदेड साप्ताहिक एक्सप्रेस नियमित स्वरूपात सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

सेवा प्रारंभाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे : गाडी क्र. १७६३१ हजूर साहिब नांदेड–टनकपूर साप्ताहिक एक्सप्रेस ही १२ जुलै २०२६ पासून नियमित धावणार असून, दर रविवारी रात्री २३.४० वाजता हजूर साहिब नांदेड येथून सुटेल. त्यानंतर पूर्णा येथे ००:५० वाजता, बसमत येथे ०१:३० वाजता, हिंगोली येथे ०२:३५ वाजता, वाशीम येथे ०३:५५ वाजता आणि अकोला जंक्शन ०५:४५ वाजता थांबून पुढे टनकपूरकडे प्रस्थान करेल आणि टनकपूर येथे सकाळी ०५.५५ वाजता पोहोचेल.

गाडी क्र. १७६३२ टनकपूर–हजूर साहिब नांदेड साप्ताहिक एक्सप्रेस ही १४ जुलै २०२६ पासून नियमित धावणार असून दर मंगळवारी सकाळी ०९.०० वाजता टनकपूर येथून सुटून कोला जंक्शन येथे १०:५५ वाजता, वाशीम येथे १२:२० वाजता, हिंगोली येथे १३:०५ वाजता, बसमत येथे १३:४५ वाजता, पूर्णा येथे १४:५० वाजता थांबून बुधवारी सायंकाळी १६:३० वाजता हजूर साहिब नांदेड येथे पोहोचेल.

ही साप्ताहिक एक्सप्रेस महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांमधील महत्त्वाच्या शहरांना थेट रेल्वे संपर्क उपलब्ध करून देणार असून, यात्रेकरू, पर्यटक, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

मार्गात ही गाडी पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशीम, अकोला जंक्शन, मलकापूर, खंडवा जंक्शन, इटारसी, राणी कमलापती, बीना, ललितपूर जंक्शन, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, ग्वाल्हेर जंक्शन, धौलपूर, आग्रा कॅन्ट, मथुरा जंक्शन, कासगंज, बदायूं, बरेली जंक्शन, इज्जतनगर, पिलीभीत आणि खतीमा या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबत टनकपूर येथे पोहोचेल.

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड मनपा प्रभाग क्रमांक १९ च्या नगरसेविका श्रीमती सुलोचना धोंडीबाराव काकडे यांच्या कौठा येथील जनसंपर्क कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी अभिवादन केले.

यावेळी उपस्थितांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात करून अभिवादन केले.

यावेळी कमलकिशोर काबरा, संजय गिरी, देवराव काकडे, चंद्रकांत डहाळे, संजय गायकवाड, पवन सोनटक्के, गणेश काकडे, विनोद काकडे यांच्यासह काहींची उपस्थिती होती.

# इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सहयोग सेवाभावी संस्था संचलित इंदिरा कॉलेज ऑङ्ग ङ्गार्मसी, विष्णुपुरी नांदेड येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बी. ङ्गार्म. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. शैक्षणिक यशाबरोबरच संस्कार, सामाजिक बांधीलकी आणि उच्च शिक्षणाची प्रेरणा देणारा हा कार्यक्रम विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या उत्स्फुर्त उपस्थितीत पार पडला. महाविद्यालय हे २००९ पासून ङ्गार्मसी शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून नॅककडून श्रेणीने मानांकन प्राप्त आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. नवघरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. शिवराज बोकडे उपस्थित होते. तसेच प्रवेश विभागाचे संचालक सुनील कदम, विभागप्रमुख डॉ. एस. बी. जाधव, डॉ. पी. पी. कार्ले, डॉ. पी. ए. कांबळे, श्रीमती भगत, श्रीमती गजाळे, पवन सागरुळे, श्रीमती श्रीकोंडा, श्रीमती लाहोटी तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. बोडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महापुरुषांचे त्याग, बलिदान, विचार आणि राष्ट्रनिर्मितीतील त्यांचे योगदान यांचे आत्मचिंतन करण्याचे आवाहन केले. शिका, स्वतःला सक्षम करा आणि समाजासाठी उपयुक्त ठरा. उच्च शिक्षण घेऊन आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी करा, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात विद्यापीठ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या यशामागील शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे योगदान आणि महाविद्यालयाने दिलेल्या शैक्षणिक वातावरणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत मनोगत मांडले. पालकांनीही आपल्या भावना व्यक्त करत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे व विद्यार्थीकेंद्री उपक्रमांचे कौतुक केले.

याप्रसंगी बी. फार्म. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि व्यावसायिक नैतिकता जपण्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनीही महाविद्यालयातील अविस्मरणीय आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नवघरे, प्राध्यापक वर्ग आणि कर्मचाऱ्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सहायक पोलीस उपनिरीक्षकपदी शेख इब्राहिम शेख इस्माईल यांची पदोन्नती



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत शेख इब्राहिम शेख इस्माईल यांची सहायक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाली. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते फित व स्टार लावून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांनी ३ जुलै रोजी काढलेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील १५ जमादारांना सहायक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली. यात ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत शेख इब्राहिम शेख इस्माईल यांना पदोन्नती मिळाली. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# एकाच टेबलवर दहा वर्षांपासून ठाण मांडून बसलेल्या वरिष्ठ लिपीक सुनील मोरे यांची चौकशी करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयात तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ एकाच टेबलवर कार्यरत असलेले वरिष्ठ लिपीक सुनील मोरे यांच्या बदलीसह त्यांच्या कार्यकाळातील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी युवासेनेने केली आहे. १५ जुलैपर्यंत प्रशासनाने ठोस कारवाई न केल्यास प्रादेशिक मंडळ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी दिला आहे. या संदर्भातील मुख्य अभियंत्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, वरिष्ठ लिपीक सुनील मोरे हे गेल्या दशकभरापासून एकाच आस्थापनातील महत्त्वाच्या टेबलवर कार्यरत असून, त्यांच्या अखत्यारीत आणखी चार वरिष्ठ लिपीक काम करत आहेत. या गटाकडून मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य प्रशासकीय कामे केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. वादग्रस्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना आर्थिक फायद्यापोटी संरक्षण दिले जात असून, त्यामुळे विभागातील प्रशासनिक पारदर्शकता धोक्यात आली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सुनील मोरे यांची तत्काळ अन्यत्र बदली करून त्यांच्या संपूर्ण कार्यकाळातील सर्व प्रशासकीय निर्णय, फायली आणि आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी युवासेनेने केली आहे. शासकीय कार्यालयात वर्षानुवर्षे एकाच जागेवर राहिल्यामुळे निर्माण झालेल्या कथित साटेलोटे आणि भ्रष्टाचाराच्या साखळीचा शोध घेण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने १५ जुलै २०२६ पर्यंत कोणतीही ठोस कारवाई केली नाही, तर मंडळ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल. आंदोलनादरम्यान निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही सचिन पाटील यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# परळी येथील तोहीद खान हत्याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**लोहा (प्रतिनिधी)–** परळी येथील मयत तोहीद खान खैराती खान यांच्या हत्याप्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व पीडित कुटुंबाला न्याय देऊन आर्थिक मदत व पुनर्वसन करावे, अशी मागणी लोहा येथील सकल मुस्लीम बांधवांच्या वतीने करण्यात आली. या मागणीचे निवेदन तहसीलदारांमार्फत शासनाकडे पाठवण्यात आले आहे.

परळी शहरातील मयत तोहीद खान खैराती खान यांची ३१ मे २०२६ रोजी अत्यंत क्रूर, अमानुष व निर्घृण पद्धतीने हत्या करण्यात आली. या घटनेमुळे एका निरपराध युवकाचा जीव गेला असून, त्याच्या कुटुंबावर मोठे दुःख कोसळले आहे. या घटनेमुळे समाजात भीती व अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मयताच्या पश्चात त्यांची पत्नी, वृद्ध आई–वडील तसेच एक मुलगा व दोन मुली असा परिवार उघड्यावर आला आहे. घरातील एकमेव कमावती व्यक्ती गमावल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. मुलांच्या शिक्षणाचा, संगोपनाचा व भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला असून, शासनाने मानवी दृष्टिकोनातून या कुटुंबाला तातडीने आर्थिक आधार देणे आवश्यक आहे. या प्रकरणानंतर समाजमाध्यमांवर एक ऑडिओ क्लिप प्रसारित झाली असून त्यामध्ये आरोपीकडून द्वेषपूर्ण वक्तव्ये करण्यात आल्याचा व मुस्लीम समाजाच्या धर्मस्थळांबाबत गंभीर धमकी दिल्याचा आरोप आहे. या ऑडिओ क्लिपची सत्यता न्यायवैद्यकीय तपासणीद्वारे पडताळून, त्यामधील बाबी सत्य आढळल्यास संबंधितांविरुद्ध लागू कायद्यांनुसार स्वतंत्र गुन्हे नोंदवून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# गवळी समाज स्मशानभूमीसाठी रस्त्यासह इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्या; कॉंग्रेसची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड शहरातील गवळी समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता उपलब्ध करून स्मशानभूमीमध्ये मूलभूत सुविधा द्याव्यात, अशी मागणी कॉंग्रेसच्या वतीने पालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



मुदखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिसरातील गवळी समाजाची स्मशानभूमी ही लक्ष्मीनारायण जिल्हा परिषद शाळेच्या उत्तर दिशेला आहे. या स्मशानभूमीचा वापर गवळी समाजातील अनेक नागरिक अंत्यसंस्कारासाठी करतात. मात्र, आजपर्यंत या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पक्का रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे अंत्यसंस्काराच्या वेळी अंत्ययात्रा घेऊन जाण्यासाठी नागरिकांना चिखल, पाणी व काटेरी झुडपांमधून मार्ग काढावा लागतो. ही परिस्थिती अत्यंत वेदनादायक असून मृत व्यक्तीच्या सन्मानालाही बाधा पोहोचवणारी आहे.

स्मशानभूमी परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज, स्ट्रीट लाईट, बसण्यासाठी शेड, स्वच्छता व इतर आवश्यक मूलभूत सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही समस्या अनेक वर्षांपासून कायम असून, वारंवार लक्ष वेधूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

या अत्यंत संवेदनशील आणि मानवी भावनांशी निगडित प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन गवळी समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करावा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्ट्रीट लाईट, वीज, बसण्यासाठी शेड तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी माजी नगरसेवक गंगाधर डांगे, युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष मुजीब पठाण, नगरसेवक खदीरभाई, संजय बोकेफोड, अविनाश चौदंते, जिल्हा कॉंग्रेसचे सचिव गिरिष कोत्तावार, सेवा दलाचे तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे, युवक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, शिवानंद देवके, रमेश बोडके, विठ्ठल आचार्य, गजानन संबोड, सुभाष चौदंते, बालाजी गुळेवाड, मोईन भाई फुलवाले, राजू चौंदते, राजरत्न क्षीरसागर, शेख अनिस शेख शरीफ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी



# लिंबू चेहऱ्यासाठी वापरा, पण जपून...

**चेहरा डागरहित आणि चमकण्यासाठी अनेक जण विविध घरगुती उपायांचा वापर करतात. लिंबू हा आम्लयुक्त पदार्थ आहे. लिंबाचा रस 2 पीएच पातळीपेक्षा जास्त असतो. लिंबाच्या रसामध्ये व्हिटॅमिन सी असल्यामुळे ते जवळजवळ प्रत्येकजण वापरतात. सायट्रिक ॲसिड, एक अल्फा हायड्रॉक्सी ॲसिडमुळे जे त्वचा स्वच्छ करण्यासाठी खूप प्रभावी मानले जाते. याशिवाय लिंबूमध्ये असलेले व्हिटॅमिन सी त्वचेतील कोलेजनची पातळी वाढवते. कोलेजन हे एक प्रोटीन आहे जे वयानुसार कमी होते आणि त्वचा सैल करते. याशिवाय स्किन टोन सुधारण्यात मदत करते. पण लिंबूचा योग्य वापर न केल्याने चेहऱ्यावर डाग येऊ शकतात.**



## लिंबू थेट वापरणे सुरक्षित आहे का ?

लिंबाचा वापर चेहऱ्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकतो यात शंका नाही. पण जर तुम्ही लिंबू थेट वापर तुमच्या चेहऱ्यावर केलात तर त्याचा वाईट परिणाम दिसून येईल. यामुळे त्वचेचे अनेक नुकसान होऊ शकते, खरेतर लिंबाचा रस 2 पीएच पातळीपेक्षा जास्त आम्लयुक्त असतो. त्यामुळे तुमच्या त्वचेला गंभीर नुकसान होऊ शकते. लिंबू थेट चोळल्यास त्वचेची जळजळ, सूर्यप्रकाशाची संवेदनशीलता, हायपरपिग्मेंटेशन, लालसरपणा यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

## लिंबाचा रस लावण्याची योग्य पद्धती

लिंबाचा रस चेहऱ्यावर लावण्याचा योग्य मार्ग म्हणजे एकतर मध लिंबू वापरणे किंवा मुलतानी मातीमध्ये लिंबाचा रस मिसळणे. बेसनाच्या पिठात लिंबाचा रस मिसळून लावू शकता. लिंबाचा रस गुलाबपाणी किंवा ग्लिसरीनमध्ये मिसळूनही लावू शकता. अशा प्रकारे लिंबाचा रस चेहऱ्यावर लावल्याने त्वचेलाच फायदा होईल.

## फेसपॅकमध्ये तयार करा वापर

चेहऱ्यावरील घाण साफ करण्यासाठी आपण फेसपॅकचा वापर करतो. पण या फेसपॅकसाठी आपण लिंबूचा वापर करु शकतो. बाजारात मिळणाऱ्या फेसपॅकमध्ये अनेक केमिकल्स असतात. त्यासाठी तुम्ही घरच्या घरी फेसपॅक तयार करु शकता. यासाठी १ लहान चमचा तांदळाचे पीठामध्ये ५ थेंब लिंबाचा रस, अर्धा चमचा गुलाबपाणी घ्या. त्यात लिंबाचा रस आणि गुलाबपाणी मिक्स करून घ्या. हे मिश्रण तुम्ही चेहऱ्यावर 15-20 मिनिट्स लावू शकता.

### केमिकल बर्न होण्याची शक्यता

याशिवाय लिंबामुळे केमिकल बर्न देखील होऊ शकते. तो त्याचा प्रभाव तेव्हाच दाखवू शकतो जेव्हा ते इतर गोष्टींमध्ये समाविष्ट करून लागू केले जाऊ शकते. लिंबाचा रस मूळ स्वरूपात वापरल्याने त्वचेचे बरेच नुकसान होऊ शकते.

### फेस स्क्रबमध्ये लिंबाचा रस

स्क्रबमध्ये देखील आपण लिंबूचा वापर करु शकतो. यासाठी १ लहान चमचा साखर, १लहान चमचा कोरफड जेल, ५ थेंब लिंबाचा रस घ्या. हा फेस स्क्रब बनवण्यासाठी एका बाऊलमध्ये साखर, कोरफड जेल आणि लिंबाचा रस मिक्स करा . या मिश्रणाने चेहरा चांगला स्क्रब करून घ्या.



# तांदळाच्या पिठाने बनवा त्वचा चमकदार अन् तरुण!

**ब्युटी सिक्रेट हा शब्द आपण नेहमीच ऐकत असतो. पण त्यासाठी सतत पार्लरच्या पायऱ्या झिजवणं नक्कीच परवडत नाही. मग अशावेळी घरातल्या पदार्थांचा वापर करणं अधिक सोपं ठरतं आणि यासाठी उत्तम मार्ग म्हणजे घरातील तांदळाचं पीठ. हो तुम्ही परफेक्ट वाचलं आहे. वास्तविक तांदळाचे पीठ हे त्वचेवरील अनेक समस्या सोडविण्यासाठी उपयोगी ठरते. मात्र याचा अधिक वापर नक्की कसा करावा याची माहिती अनेकांना नसते.**

## काळ्या डागांसाठी उपयोगी

तांदळाच्या पिठाच्या फेसपॅकमध्ये ब्लॅक टी प्रमाणे अँटीऑक्सडंट गुण आढळतात, जे त्वचेला हानी पोहचविणाऱ्या विषारी पदार्थ, डार्क स्पॉट अर्थात काळे डाग, ॲक्ने आणि ब्लेमिलच्या कारणांमुळे तयार होणाऱ्या बॅक्टेरियाला हटविण्यास मदत करतात.

- साहित्य : १ चमचा तांदळाचे पीठ, १ ब्लॅक टी पिशवी, १ चमचा मध, थोडेसे गरम पाणी.
- बनविण्याची पद्धत : एका बाऊलमध्ये उकळलेले गरम पाणी घ्या आणि त्यात ब्लॅक टी ची बॅग साधारण २-३ मिनिट्स ठेवा. त्यानंतर त्यात तांदळाचे पीठ आणि मध मिक्स करा. याची एक पेस्ट बनवून घ्या आणि हलक्या हाताने चेहऱ्यावर क्लॉकवाईज दिशेने लावा. साधारण १० ते १५ मिनिट्स तसंच ठेवा आणि मग सुकल्यावर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. चांगल्या परिणामासाठी थंड पाण्यानेच चेहरा धुवा.



## डार्क पिगमेंटेशन

पि गमेंटेशनसाठी तांदळाच्या पिठाचा मास्क खूपच चांगला ठरतो. कारण यामुळे निस्तेज, कोरडी त्वचा दूर होण्यास मदत मिळते.

- साहित्य : १ चमचा तांदळाचे पीठ, १ चमचा फ्रेश क्रिम, चिमूटभर हळद.
- बनविण्याची पद्धत : तांदळाच्या पिठात फ्रेश क्रिम आणि हळद मिक्स करून घ्या. आता हे तुम्ही चेहऱ्यावर आणि गळ्यावर व्यवस्थित लावा. साधारण १० - १५ मिनिट्स सुकू द्या आणि मग थंड पाण्याने चेहरा धुवा. चांगल्या परिणामांसाठी तुम्ही आठवड्यातून किमान २ वेळा याचा उपयोग करू शकता.

## टॅनिंग घालविण्यासाठी

सूर्याच्या प्रकाशात अधिक काळ राहिल्याने त्वचेवर टॅनिंग तयार होते आणि मग त्यामुळे त्वचा काळी पडते. यासाठी तुम्ही गुलाबबाण्याचा वापर करून त्वचेला नैसर्गिक चमक देऊ शकता आणि मध तुमच्या त्वचेला पोषण आणि मॉईस्चराईज करण्यासाठी उपयोगी ठरते.

- साहित्य : २ चमचे तांदळाचे पीठ, १ चमचा मध, १ चमचा गुलाबपाणी.
- बनविण्याची पद्धत : एका बाऊलमध्ये तिन्ही पदार्थ एकत्र करून घ्या. त्यानंतर हे हलक्या हाताने चेहऱ्याला लावा. साधारण १० - १५ मिनिट्स तसंच ठेवा. मग चेहरा गरम पाण्याने धुवा. चांगल्या परिणामांसाठी तुम्ही आठवड्यातून एकदा याचा वापर करावा.



### काळ्या वर्तुळांसाठी उपयोगी

तांदळा चे पीठ हे डार्क सर्कल्स कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते आणि तसंच याचे अन्य जादुई फायदेही आहेत. यामुळेच हा साधासा तांदळाच्या पिठाचा मास्क तुम्हाला उपयोगी ठरेल.

- साहित्य : १ चमचा तांदळाचे पीठ, १ चमचा बेसन, १ कापलेला टोमॅटो, चिमूटभर हळद.
- बनविण्याची पद्धत : सर्व साहित्य एका बाऊलमध्ये मिक्स करा. आता चेहऱ्यावर आणि गळ्यावर लावा. कमीत कमी १०-१५ मिनिट्स ठेवा आणि कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ करा. चांगल्या परिणामांसाठी रोज तुम्ही याचा वापर करू शकता.

### सुरकुत्या घालवा

ब्लेमिश, सुरकुत्या आणि स्कार्स इत्यादीसाठी तांदळाचे पीठ अत्यंत उपयोगी ठरते. तुमच्या त्वचेमध्ये कसावट आणण्यासाठी आणि नैसर्गिक चमक देण्यासाठी याचा उपयोग होतो.

- साहित्य : २ चमचे तांदळाचे पीठ, १ चमचा मक्याचे पीठ, १ चमचा मध, २ चमचे दूध.
- बनविण्याची पद्धत : सर्व साहित्य घेऊन त्याची एका बाऊलमध्ये पेस्ट बनवा. कमीत कमी २०-२५ मिनिट्स तसंच राहू द्या. त्यानंतर गरम पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. चांगल्या परिणामांसाठी आठवड्यातून किमान दोन वेळा वापर करा. तुमच्या त्वचेला कोणत्याही पदार्थाची अलर्जी असल्यास याचा वापर करू नका. ही माहिती ब्युटिशियनकडून सांगण्यात आली आहे. मात्र संवेदनशील त्वचा असेल तर पॅच टेस्ट केल्याशिवाय कोणताही वापर करू नका.

# सतत चष्मा वापरल्याने नाकावर काळे डाग?

**चष्म्याच्या बाबतीत एक समान्य गोष्ट म्हणजे सतत चष्मा लावल्यामुळे डोळ्यांजवळ काळे डाग पडतात. असे डाग चेहऱ्याला सौंदर्य आणि तुमच्या लुकवर परिणाम करू शकतात. पण घरातील काही गोष्टी वापरुन तुम्ही या डागांवर उपचार करु शकता. चला तर मग जाणून घेऊयाता कोणत्या आहेत त्या गोष्टी...**

आजकाल ताण आणि अनेक बदललेल्या जीवनशैलीमुळे कोणत्याही वयात चश्मा लागू शकतो. कधी कधी जास्त नंबरचा चष्मा सतत लावण्याने डोळे अजून खराब होतात. अशात मोबाईल,संगणक, टीव्हीवर जास्त वेळ डोळे लावून बसणे, आहारात पौष्टिक घटकांची कमतरता, डोळ्यांचा व्यायाम, काळजी न घेणे, डोळ्यांना विश्रांती न देणे अशा सवयींमुळे अनेकदा लोकांचे डोळे कमकुवत होऊ लागतात. अशात दिर्घकाळासाठी चष्मा लागू शकतो. पण सतत चष्मा वापरल्याने डोळ्यांच्या जवळ काळे डाग निर्माण होतात. अशात तुमच्या चेहऱ्यावर दिर्घकाळासाठी डाग राहतात. पण घरातील काही गोष्टींचा वापर करुन तुम्ही हे डाग काढू शकता. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी.



- कोरफडाचे जेल : आपल्या डोळ्याजवळीत त्वचा अतिशय नाजूक असते त्यामुळे या भागाची काळजी घेताना काळजी घेणे अतिशय आवश्यक असते. कोरफड रोप बहूतेक सर्वच घरात अढळते. तुमच्या या समस्येवर ॲलोवेरा जेल तुमची मदत करू शकते. हा उपाय करण्यासाठी डाग असणाऱ्या ठिकाणी ॲलोवेरा जेल लावून थोडावेळासाठी हे जेल तसेच ठेवून द्या. शक्यतो हा उपाय रात्री करुन पाहा. आपल्या डोळ्याजवळीत त्वचा अतिशय नाजूक असते त्यामुळे या भागाची काळजी घेताना काळजी घेणे अतिशय आवश्यक असते.
- काकडीचा असा करा वापर : काकडीचा वापर करुन तुम्ही नाक आणि डोळ्यांखालील डागांपासून सुटका मिळवू शकता. साठी काकडीचे काप थोडावेळ फ्रिजमध्ये ठेवा त्यानंतर, डाग असणाऱ्या भागावर काही वेळासाठी ठेवा यामुळे फरक जाणवेल. हा उपाय तुम्ही आठवड्यातून दोन ते तीन वेळीस करु शकता.
- बदामाचे तेल : चष्म्यामुळे डाग पडलेल्या भागावर बदामाचे तेल लाऊ शकता, रात्रीच्या वेळी याचा वापर करणे जास्त फायदेशीर ठरेल. रात्री आपल्या संपूर्ण शरीराची वाढ होत असते. अशात बदामाच्या तेलाचा वापर करुन आपण सुंदर या समस्येपासून सुटका मिळवू शकतो.



- गुलाबपाणी : हा उपाय करण्यासाठी गुलाबपाणी मिसळून मिश्रण तयार करा आणि हे मिश्रण डाग असणाऱ्या भागांवर लावा, यामुळे डागांपासून सुटका मिळण्यास मदत मिळेल.
- पुदिना आणि लिंबू : पुदिना आणि लिंबू शक्यतो सर्वच घरात मिळते. हा उपाय करण्यासाठी थोडा लिंबाचा रस घेऊन त्यात थोडा पुदिना मिसळून मिश्रण तयार करा. त्यानंतर हे मिश्रण नाकावर डाग असणाऱ्या ठिकाणी लावा आणि १५ मिनिटांनी कोमट पाण्याने चेहरा धुवून घ्या. यामुळे डागांपासून सुटका मिळण्यास मदत मिळेल. हा उपाय करताना हे मिश्रण डोळ्यात जाणार नाही याची काळजी घ्या.

# संत्रा साल देईल चमकदार त्वचा

**उन्हाळ्यात त्वचेचा पोत खराब होतो. या काळात त्वचेच्या संबंधित अनेक अडचणी येतात. कडक सूर्यप्रकाश त्वचेची चमक काढून घेतो. त्यामुळे चेहऱ्यावर घाण आणि टॅनची समस्या निर्माण होते. यापासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही संत्र्याच्या सालीपासून बनवलेले फेस पॅक लावू शकता...**

सर्व सिजनमध्ये अगदी सहज उपलब्ध होणारे संत्रा त्वचेसाठी देखील खूपच फायदेशीर असते. संत्रा हा आरोग्याचा खजिना असतो. यामध्ये मोठ्या प्रमाणात व्हिटॅमिन-सी आणि कॅल्शियमचा उत्कृष्ट स्त्रोत आहे. पण अनेकदा लोक संत्र खाऊन त्याचे साल फेकून देतात. पण उन्हाळ्यात त्वचेची चमक कायम ठेवण्यासाठी या सालींपासून बनवलेला फेसपॅकचा वापर तुम्ही करू शकता. संत्राच्या सालीमध्ये कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम सारखे घटक आढळतात. जे त्वचेशी संबंधित समस्या कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. चला तर मग जाणून घेऊया, संत्र्याच्या सालीचा फेस पॅक कसा बनवायचा.



- तांदळाचे पीठ आणि संत्र्याच्या सालीची पावडर : हा फेस पॅक बनवण्यासाठी एका भांड्यात 2 चमचे तांदळाचे पीठ आणि संत्र्याच्या सालीची पावडर घ्या. आता त्यात आवश्यकतेनुसार गुलाबजल मिसळा. ही पेस्ट चेहऱ्यावर लावा, सुमारे 15-20 मिनिटांनी पाण्याने धुवा. हा फेस पॅक तुम्ही आठवड्यातून एकदा किंवा दोनदा वापरू शकता. यामुळे चेहऱ्याची चमक येते.
- बेसन आणि संत्र्याच्या सालीची पावडर : जर तुम्ही कोरड्या त्वचेच्या समस्येने त्रस्त असाल तर हा फेस पॅक तुमच्यासाठी प्रभावी ठरू शकतो. हा फेसपॅक करण्यासाठी एक चमचा बेसन घ्या, त्यात एक चमचा संत्र्याच्या सालीची पावडर घाला. या मिश्रणात मध टाकून पेस्ट तयार करा. आता हा पॅक चेहऱ्यावर लावा. सुमारे 10-15 मिनिटांनी पाण्याने धुवा.
- संत्र्याच्या सालीची पावडर आणि चंदन : एका भांड्यात संत्र्याच्या सालीची पावडर आणि चंदन घ्या. त्यात गुलाब पाणी आणि लिंबाचा रस मिसळा. ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. सुमारे 10 मिनिटे कोरडे होऊ द्या. यानंतर पाण्याने धुवा. कडक उन्हात ही पावडर तुमच्या त्वचेला थंडावा देण्यास मदत करेल.



- एलोवेरा जेल आणि संत्र्याच्या सालीची पावडर : त्वचेसाठी एलोवेरा जेल खूप फायदेशीर असते. हा पॅक बनवण्यासाठी एका बाऊलमध्ये २ टेबलस्पून एलोवेरा जेल घ्या. त्यात संत्र्याच्या सालीची पावडर घाला. या मिश्रणात २-३ थेंब लिंबाचा रस मिसळा. आता ही पेस्ट चांगली फेटा. हा पॅक चेहऱ्यावर लावा. साधारण 15 मिनिटांनी पाण्याने स्वच्छ धुवा.
- संत्र्याच्या सालीची पावडर आणि साखर : एका भांड्यात १ चमचा संत्र्याच्या सालीची पावडर घ्या. त्यात अर्धा चमचा साखर घाला. या मिश्रणात लिंबाचा रस आणि गुलाबपाणी घाला. आता या स्क्रबने चेहऱ्याला हलक्या हाताने मसाज करा. काही वेळाने पाण्याने स्वच्छ धुवा. यामुळे चेहऱ्यावरील मृत त्वचा निघून जाण्यास मदत होईल.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# मोटारसायकल चोरीचे १५ गुन्हे उघड, ७.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त

## शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाची कारवाई




**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मोटारसायकल चोरीचा यशस्वी तपास करत १५ दुचाकी जप्त केल्या आहेत. जप्त केलेल्या वाहनांची एकूण किंमत ७ लाख ६२ हजार रुपये आहे.

गुन्हे शोध पथकातील पोउपनि इरफान सय्यद व त्यांचे पथक मालमत्ताविषयक गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना शिवाजीनगर हद्दीत पेट्रोलिंग करत होते. यावेळी रेकॉर्डवरील सराईत आरोपी रमेश शामराव कयापाक (वय ४०, रा. कुपटी, ता. किनवट, ह.मु. श्रावस्तीनगर, नांदेड) हा संशयास्पदरित्या फिरताना मिळून आला. त्याला ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील मालमत्ताविषयक गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपीने दिलेल्या माहितीवरून त्याच्याकडून शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील पाच गुन्हे, वजिराबाद- ३, भाग्यनगर- १, भोकर- २, हिमायतनगर- २, मांडवी ३ आणि तेलंगणा पासिंगच्या २ बेवारस मोटारसायकल असा एकूण १५ वाहनांचा मुद्देमाल विविध ठिकाणांहून जप्त करण्यात आला. अशा प्रकारे एकूण १३ गुन्ह्यांतील १३ मोटारसायकल आणि २ बेवारस अशा एकूण १५ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर वेंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकातील पोउपनि इरफान सय्यद, हवालदार उमेश आकोसकर, अंमलदार जसपालसिंग कालो, गोरखनाथ काकडे, संजय यमलवाड, गजानन जोगपेटे, बालाजी यादगीरवाड यांनी केली.

# पत्नीवर जीवघेणा हल्ला; पतीला १ वर्ष कारावास

**किनवट (प्रतिनिधी) –** कौटुंबिक वादातून पत्नीला काठीने बेदम मारहाण करून गंभीर जखमी करणाऱ्या आरोपीला किनवटच्या दिवाणी न्यायालयाने दोषी ठरवून एक वर्ष सश्रम कारावास आणि ५ हजार रुपये दंड ठोठावला आहे.

किनवट तालुक्यातील पांधरा येथे दि.१३ जाने.२०२६ रोजी कौटुंबिक वादातून आरोपी मारुती टारपे याने त्याची पत्नी शकुंतला मारोती टारपे यांना काठीने जबर मारहाण केली होती. या हल्ल्यात शकुंतला गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यानंतर त्यांच्या तक्रारीवरून किनवट पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८(२), ११८(१), ११५(१), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्ह्याचा तपास जमादार पुरी यांनी केला. त्यांनी घटनेचा सखोल तपास करून न्यायालयात भक्कम पुरावे आणि दोषारोपपत्र सादर केले.

किनवट दिवाणी न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पी. एम. माने यांनी सरकार पक्षाचा युक्तिवाद आणि पुरावे ग्राह्य धरून आरोपी मारुती टारपे याला दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपीला भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१) आणि ११५(२) अंतर्गत प्रत्येक कलमान्वये १ वर्ष सश्रम कारावास आणि ५ हजार रुपये दंड ठोठावला आहे.

# 'एसआयआर' मोहिमेस ग्रामस्थांनी सहकार्य करावे– महेश पाटील



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी मंगळवारी लोहा तालुक्यातील धानोरा व पिंपळगाव ढगे या गावांना भेट देऊन विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेंतर्गत सुरू असलेल्या गणना पत्रके भरण्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बुथस्तरीय अधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या गृहभेटींचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

ग्रामस्थांशी संवाद साधताना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील म्हणाले की, मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे गणना पत्रके भरण्यासाठी गृहभेटी देणाऱ्या बुथस्तरीय अधिकाऱ्यांना नागरिकांनी संपूर्ण सहकार्य करून आवश्यक ती अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी. प्रत्येक पात्र नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. गावातील युवकांनीही या मोहिमेत पुढाकार घेऊन बुथस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. विशेषतः एकाच समाजाची किंवा समान आडनावांची कुटुंबे मोठ्या प्रमाणात असलेल्या गावांमध्ये २० ते २५ युवकांचे स्वयंसेवक गट तयार करून त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. या गटामार्फत गृहभेटी घेऊन नागरिकांना मोहिमेची माहिती देणे, भरलेली गणना पत्रके विहित मुदतीत संकलित करणे तसेच त्यांची ऑनलाईन नोंदणी वेळेत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

दौऱ्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सुरू असलेल्या घरकुल बांधकामांचीही पाहणी केली. लाभार्थ्यांशी संवाद साधून कामाच्या प्रगतीची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, गट विकास अधिकारी कुलकर्णी, नायब तहसीलदार संदीप हडगे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कामठा येथील शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन उगवलेच नाही



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील कामठा बु. येथील शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये दोन बॅग सोयाबीनची पेरणी केली, पण निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणे असल्यामुळे उगवले नाही. या प्रकारामुळे शेतकऱ्यांनी कंपनीच्या विरोधात तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दिली आहे.

अर्धापूर तालुक्यातील कामठा बु. येथील शेतकरी परमेश्वर विश्वनाथ गाढवे यांनी दि.३० जून रोजी महाबीज या कंपनीचे बियाणे बीबीएफ पद्धतीने यंत्रणाच्या सहाय्याने पेरणी केली होती. सात ते आठ दिवसांचा कालावधी उलटला तरीही त्यांच्या शेतामध्ये बीज अंकुरण झाले नाही. या कंपनीचे बियाणे निकृष्ट असल्याचा दावा करत तालुका कृषी अधिकारी अर्धापूर यांना सदर प्रकरणी पाहणी करून कंपनी विरोधात योग्य ती कारवाई करून नुकसान भरपाई द्यावी या मागणीचे निवेदन शेतकरी परमेश्वर गाढवे यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात दिला आहे.

यावेळी प्रहारचे तालुकाध्यक्ष छगन सांगोळे म्हणाले की, महाबीजने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. ऐन हंगामात शेतकऱ्यावर दुबार पेरणीची वेळ आणणाऱ्या बियाणे कंपनीवर तात्काळ गुन्हा दाखल झाला पाहिजे. कृषी विभागाने तत्परतेने बांधावर जाऊन पाहणी करून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळवून द्यावी अन्यथा प्रहार स्टाईलने कृषी अधिकारी कार्यालयावर तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा सांगोळे यांनी दिला आहे.

# गिरीश कुबेर यांचे व्याख्यान



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या ९४ व्या जयंतीचे औचित्य साधून रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार आणि दै. लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या विशेष व्याख्यानात ते 'महाराष्ट्राची वैचारिक परंपरा' या विषयावर मांडणी करणार आहेत.

गिरीश कुबेर हे मराठीतील एक नामवंत आणि व्यासंगी पत्रकार, लेखक आणि संपादक म्हणून ज्ञात आहेत. मराठी समाजातील सर्व स्तरांमध्ये दै. लोकसत्तातील त्यांचे अग्रलेख हे आवर्जून वाचले जातात आणि लोकप्रिय आहेत. आंतरराष्ट्रीय अर्थकारण आणि राजकारण हे त्यांच्या विशेष अभ्यासाचे विषय आहेत. २०१० पासून ते लोकसत्ताचे संपादक आहेत. त्याआधी ते इकॉनॉमिक टाईम्स या इंग्रजी दैनिकात तसेच महाराष्ट्र टाइम्समध्ये कार्यरत होते. त्यांनी मराठी व इंग्रजीत विपुल लेखन केले आहे. 'अधर्मयुध्द', 'एका तेलियाने', 'टाटायन', 'युध्द जिवांचे', 'हा तेल नावाचा इतिहास आहे', आणि 'पुतिन : महासत्तेच्या इतिहासाचे अस्वस्थ वर्तमान' हे त्यांचे काही महत्त्वाचे ग्रंथ होत.

# मुदखेड येथे डीएएसओ-१८ प्रशिक्षणार्थ्यांचा दीक्षांत व शपथविधी सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालय मुदखेड येथे थेट नियुक्त अधीनस्थ अधिकारी (डीएएसओ-१८) मूलभूत प्रशिक्षणक्रमाच्या ५७ प्रशिक्षणार्थ्यांचा दीक्षांत व शपथविधी सोहळा नुकताच उत्साहपूर्ण पार पडला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी पोलीस महानिरीक्षक तथा मुदखेडच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य आर. गोपाला कृष्ण राव (भा.पो.से.) हे होते. त्यांनी आकर्षक परेडची सलामी स्वीकारून प्रशिक्षणार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. देशातील विविध राज्यांतून केंद्रीय राखीव पोलीस दलात थेट नियुक्त झालेल्या ५७ अधीनस्थ अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांनी ४८ आठवड्यांचे मूलभूत प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. या कालावधीत त्यांना शारीरिक क्षमता विकास, विविध अस्त्र-शस्त्रांचे प्रशिक्षण, युद्धकौशल्य, अंतर्गत सुरक्षा, प्रशासकीय जबाबदाऱ्या तसेच कर्तव्य पालनासंबंधी विविध विषयांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी कमांडंट वेद प्रकाश त्रिपाठी यांनी उपनिरीक्षक (जीडी) प्रशिक्षणार्थ्यांना दलाच्या सदस्यत्वाची शपथ दिली. देशाची एकता, अखंडता व सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी तसेच कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रसेवेसाठी तत्पर राहण्याची प्रतिज्ञा प्रशिक्षणार्थ्यांनी यावेळी केली. यावेळी मार्गदर्शन करताना आर. गोपाला कृष्ण राव यांनी नवप्रशिक्षित अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून सेवाकाळात येणाऱ्या आव्हानांचा धैर्याने सामना करीत शिस्त, समर्पण आणि कर्तव्यनिष्ठा जपत देशसेवा करण्याचे आवाहन केले. प्रशिक्षणादरम्यान विविध विषयांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचा त्यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. परेडदरम्यान प्रशिक्षणार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आपल्या कौशल्याचे प्रभावी सादरीकरण केले.

या दीक्षांत सोहळ्यास प्रशिक्षणार्थ्यांचे पालक व कुटुंबीय, आरटीसी सीआरपीएफ, लातूरचे पोलीस उपमहानिरीक्षक अमीरिल हसन अन्सारी, केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयाचे मुख्य प्रशिक्षण अधिकारी वेद प्रकाश त्रिपाठी, नांदेड जिल्ह्यातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, मान्यवर नागरिक, विविध शाळांचे शिक्षक, विद्यार्थी तसेच केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोकरमध्ये बिबट्याचा वावर; वनविभागाच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला



**भोकर (प्रतिनीधी)–** भोकर शहरातील हनुमाननगर (वॉर्ड क्र. ३) येथील नगरपालिकेच्या डम्पिंग ग्राउंड परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास कचरा टाकण्यासाठी गेलेल्या सफाई कामगारांना अचानक बिबट्या समोरासमोर दिसल्याने एकच खळबळ उडाली. या थरारक दृश्याचा कामगारांनी मोबाईलमध्ये व्हीडीओदेखील कैद केला आहे.

मंगळवारी सायंकाळी नगरपालिकेचे सफाई कामगार कचरा टाकण्यासाठी डम्पिंग ग्राउंडवर गेले होते. कचरा खाली करत असताना झाडीमधून अचानक एक बिबट्या कचऱ्याच्या ढिगावर येऊन बसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या धक्कादायक घटनेची माहिती मिळताच स्थानिक रहिवासी सीताराम मेटकर यांनी प्रभागाचे नगरसेवक योगेश भोकरकर (देशपांडे) यांना कळवले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नगरसेवकांनी तातडीने वनपरिक्षेत्र अधिकारी अंगद खटाने यांच्याशी संपर्क साधून वनविभागाला पाचारण केले.

या प्रकरणाची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी खटाने यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिमंडळ अधिकारी एस. डी. घोरबांड, वनरक्षक ए. पी. मुंडकर, एस. आर. वट्टमवार, एच. बी. धुळगुंडे आणि एस. डी. भोंग यांच्या विशेष रेस्क्यू पथकाने रात्री १०:३० वाजता डम्पिंग ग्राउंड गाठले. वन कर्मचाऱ्यांनी हातात लाठ्या-काठ्या आणि हायपावर बॅटऱ्या घेऊन संपूर्ण परिसराची कसून पाहणी केली. बिबट्या आसपासच्या झाडीत दबा धरून बसला असण्याची शक्यता असल्याने त्याला मानवी वस्तीपासून दूर जंगलाच्या दिशेने पिटाळण्यासाठी वनविभागाने परिसरात मोठ्या आवाजाचे फटाके फोडले. वनविभागाच्या या तत्परतेमुळे बिबट्या पुन्हा जंगलाकडे निघून गेल्याने सध्या मोठा धोका टळला आहे.

डम्पिंग ग्राउंड हे हनुमाननगरसारख्या दाट लोकवस्तीच्या अगदी जवळ आहे. बिबट्याचा वावर वाढल्याने भविष्यात पाळीव प्राणी किंवा लहान मुलांवर हल्ला होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या परिसरात वनविभागाने कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून पिंजरा लावण्याची मागणी रहिवाशांनी केली आहे.

# वारकऱ्यांसाठी नांदेडहून पंढरपूरला दररोज २०० बसेस धावणार



**नांदेड (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशीच्या पंढरपूर यात्रेनिमित्त वारकऱ्यांच्या सोयीसाठी नांदेड एसटी विभागाने मोठी पावले उचलली आहेत. भाविकांना सुलभ आणि सुरक्षित प्रवास मिळावा यासाठी नांदेड विभागातून पंढरपूरकडे २०० अतिरिक्त बसेस सोडण्यात आल्या असल्याची माहिती विभागीय नियंत्रक देशमुख यांनी दिली.

एसटी महामंडळाच्या वतीने आषाढी यात्रेचा विचार करून विशेष नियोजन करण्यात आले आहे. नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर या जिल्ह्यांतील प्रमुख आगारांमधून या बसेस सोडण्यात येणार आहेत. यामध्ये सामान्य, शिवशाही आणि आसन व्यवस्था असलेल्या बसेसचाही समावेश आहे. भाविक व प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दिवसभरात अतिरिक्त फेऱ्या वाढविण्यात आल्या आहेत. प्रवाशांनी गर्दी टाळण्यासाठी ऑनलाईन आगाऊ आरक्षण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्रत्येक बससोबत चालक, वाहकासह आवश्यक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

एसटी प्रशासनाने सांगितले की, भाविकांचा प्रतिसाद पाहून बसेसची संख्या आणखी वाढविली जाऊ शकते. यात्रेदरम्यान कोणत्याही प्रवाशाची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष नियंत्रण कक्ष देखील सुरू करण्यात आला आहे. वारकरी संप्रदायाने एसटी प्रशासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून, बसेस वाढल्याने वारीसाठी जाणे अधिक सोयीचे झाले आहे, अशी प्रतिक्रिया भाविकांनी दिली. नांदेड आगार- ३३, भोकर- २०, किनवट- १५, मुखेड- ३०, देगलूर- २८, कंधार- ३०, हदगाव- २०, बिलोली २०, माहूर- ४.

## नांदासौख्यभरे

**कोनाळे-गायकवाड**

नांदेड येथील रहिवासी सौ. अनुसया व प्रा. व्यंकट कोनाळे यांची सुकन्या चि. सौ. कां. श्रीनिजा आणि छ. संभाजीनगर येथील रहिवासी सौ. कालिंदा व प्रा. रामदास गायकवाड यांचे सुपुत्र चि. कुलभूषण यांचा शुभविवाह गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.३० वा. हॉटेल अम्बेसेडर अजंता छ. संभाजीनगर येथे संपन्न होत आहे. वधु-वरास हार्दिक शुभेच्छा.

**-मुख्य संपादक**

# आरोग्यास घातक 'खर्रा' बनविणाऱ्या गोदामावर डीवायएसपी पथकाचा छापा; ७ आरोपी जेरबंद

**किनवट (प्रतिनिधी) –** अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवाईनंतरही चोरट्या मार्गाने शहरातील रामनगरात सुरू असलेल्या गुटख्याच्या अड्ड्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्या विशेष पथकाने मंगळवार, दि. ७ छापा टाकला. या कारवाईत तंबाखूजन्य पदार्थ (खर्रा) तयार करणारे ५१ हजार ४२० रुपयांचे साहित्य जप्त केले असून, याप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवाईच्या मोहिमेनंतरही शहरासह तालुक्यात गुटखा पुड्या, खर्रा लपून छपून विक्री होत आहे. शहराच्या रामनगरातील एका टिन शेडमध्ये तंबाखू, सुपारी, चुना मिश्रित 'खर्रा' तयार करून विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती डीवायएसपी चंद्रशेखर कदम यांच्या पथकाला मंगळवारी पहाटे मिळाली होती. या माहितीनुसार डीवायएसपी कदम यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत तंबाखूजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे मशीन, चुना, सुपारी, तंबाखू, पॅकिंग साहित्य व इतर साहित्य असा एकूण ५१ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

याप्रकरणी आरोपी गजानन नारायण बैनवाड (रा. रामनगर, किनवट), राहुल किशन नरोटे (रा. शिवाजीनगर, किनवट), श्रीकांत इरबाजी वाघमारे (रा. गोकुंदा, किनवट), विनायक सुभा देणेवार (रा. रामनगर किनवट), नकुल संतोष भंडारे (रा. रामनगर किनवट), दिलीप मल्लया रामशेट्टीवार (रा. रामनगर किनवट) व शिवा विनोद बेल्सलवार (रा. रामनगर किनवट) यांना ताब्यात घेवून त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २७४, २७५, ३(५) तसेच अन्नसुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम ५९ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस उपनिरीक्षक फडेवार हे अधिक चौकशी करीत आहेत. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक बाबुराव भरकाडे, सपोउपनि मणिकराम आडे, पोकॉ शाम चव्हाण यांनी पार पाडली.

# ओमप्रकाश चालीकवार यांची इच्छाशक्ती आजही तितकीच सक्षम

## -खा. अशोकराव चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ उद्योजक, बालाजी फिल्म डिस्ट्रीब्युटर्स, दीपक फिल्म्स, गेलॉर्ड एंटरप्रायझेसचे संचालक तसेच दैनिक सत्यप्रभाचे संस्थापक संपादक ओमप्रकाश चालीकवार यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त व सौ. नंदाताई चालीकवार यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त आणि उभयतांच्या सुवर्ण विवाहमहोत्सवानिमित्त आयोजित सोहळ्यात माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी ओमप्रकाश चालीकवार यांच्या कार्याचा गौरव करत, त्यांना निवृत्त करण्याचा आमचा अजून विचार नाही. त्यांची इच्छाशक्ती, कार्यक्षमता आणि जबाबदारी पार पाडण्याची क्षमता आजही तितकीच मजबूत आहे. भविष्यातही त्यांच्याकडे दिलेले प्रत्येक काम ते यशस्वीपणे पूर्ण करतील, असा विश्वास व्यक्त केला.

हॉटेल स्कायलाईट नांदेड येथे झालेल्या या सोहळ्यात छायाचित्रकार विजय होकर्णे प्रस्तुत 'कर्तृत्वाचा प्रवास' या चरित्रात्मक माहितीपटाचे प्रकाशन आणि प्रथम प्रदर्शन अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी एकनाथ महाराज (साधू), माजी मंत्री डी. पी. सावंत, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, आमदार अमर राजूरकर, ज्येष्ठ विचारवंत तथा पत्रकार मधुकर भावे, नांदेडच्या महापौर कविता मुळे, नरेंद्र चव्हाण, डॉ. ऋतुराज जाधव, ओमप्रकाश गिल्डा, श्रीराम मेडेवार, सतीश सामते, कमल कोठारी, अरविंद शिंदे, विजय येवनकर, संतोष पांडागळे, बिशन यादव, अशोक पाटील धनेगावकर, दिवाकर शेट्टी, रमेश मिरजकर, ओमप्रकाश मानधने, शरद चालीकवार यांच्यासह उद्योग, पत्रकारिता, चित्रपट, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात अशोकराव चव्हाण म्हणाले की, राजकीय प्रवासात अनेक सहकाऱ्यांनी योगदान दिले असून, त्यामध्ये ओमप्रकाश चालीकवार यांचे स्थान अग्रक्रमाचे आहे. टुरिंग टॉकीजपासून वातानुकूलित चित्रपटगृहांपर्यंतचा त्यांचा प्रवास संघर्ष, कष्ट आणि दूरदृष्टीचा आदर्श आहे. मराठवाड्यात चित्रपट वितरण क्षेत्राची भक्कम पायाभरणी त्यांनी केली. नाट्य संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध सार्वजनिक उपक्रमांच्या जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत कुशलतेने पार पाडल्या. आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तंत्रज्ञान झपाट्याने बदलत असले तरी चालीकवार यांची कार्यतत्परता आणि जिद्द प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com